म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ... वा. वा.
दा. क्र. ८१०

BVBK-0400890
BVBK-0400890

म. ग्रं. सं. ठाणे, नौपाडा शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र. ८९०
विषय ..[illegible]..  क्र. ३८५
BVBK-0400890
BVBK-0400890

रंगनाथ कुळकर्णी कथित

# एका गाढवाची कहाणी

दा. क्र. ६९०
विषय कि२७२

**प्रभा प्रकाशन**
देवनगर, खामला रोड
नागपूर–१५
मुल्य ५ रु.

प्रकाशक :

गजाभाऊ देशमुख
प्रभा प्रकाशन
देवनगर, खामला रोड
नागपूर-१५

© रंगनाथ कुळकर्णी

मुद्रक :

मा. वै. वराडपांडे
तरुण भारत प्रेस,
रामदासपेठ, नागपूर-१०.

जय जय जय जय जन जनार्दना
विनत वंदना तू घेई
तुझीच आता करण्या सेवा
बुद्धिवैभवा तू देई ॥ध्रु०॥
नटराजा सम उदार तूहि
नव नाटक सुम हे घेई
सेवा भावे दिले त्यामधे
असो नसो वा गुण कांही ॥१॥

विद्याधर गोखल्यांनी माझ्यासाठी लिहिलेल्या या नांदीवल्या विनम्र भावनेने

२६ जानेवारी १९६६ ला

मी "सुरईतला राक्षस" ही गोष्ट मुलांना रंगमंचावरुन सांगू लागलो.

"राक्षसा"ची धावपळ चालू असतानाच

कृष्णचंद्र यांच्या या बोलक्या गाढवाची आणि माझी भेट झाली.

२६ नोव्हेंबर १९६६ ला

अहमदनगर कॉलेज मधे मी "...कहाणी"चा पहिला प्रयोग केला.

१७ नोव्हेंबर १९७४ ला

मुंबईच्या रवींद्र नाट्य मंदिरात ४०० वा प्रयोग झाला !!

गेली नऊदहा वर्षे ह्या "...कहाणी" ने मला अतिशय आनंद दिला. माझा कायापालट केला.

आयुष्याकडे मिस्किल डोळयांनी पाहून

डोंगराएवढी दुःख पचवायला शिकवलं...

त्यानंतर श्रीपाद कृष्णांचे

"सुदाम्याचे पोहे"

पचवून तर माझी वाङ्मयीन प्रकृति चांगलीच सुधारली !

आता स्वतःच्या पायाने चालून

नवे नवे खूप काही करायची उमेद बाळगून आहे...

मला दाद देणाऱ्या लाखो रसिकांना विनम्र अभिवादन !

१७ नोव्हेंबर १९७४

—रंगनाथ कुळकर्णी

# एका गाढवाची कहाणी

आपणासारख्या थोर रसिकांसमोर उभं रहाताना माझी
छाती धड धड करतेय् ...
कारण–
मी काही कुणी साधु-संन्यासी नाही,
महात्मा धर्मात्मा नाही,
किंवा
वाट्टेल ती पापं करून मोठमोठ्या आलिशान गाड्या उडवणारा
डॉक्टर–इंजिनियर नाही !
मी आहे एक साधारण गाढव–
हां– हसू नका–
मागच्या जन्मी मात्र मी माणूस असलो पाहिजे !
त्याशिवाय हा वर्तमानपत्रं वाचण्याचा,
माणसासारखं बोलायचा रोग मला जडलाय्
त्याची संगती लागत नाही.
म्हणजे, तसा मी मूळचा लखनौचा–
तिथं, सय्यद अली नावाचे बॅरिस्टर घर बांधत होते.
आमचा मालक ढब्बू कुंभार त्यांना विटा 'सप्लाय' करायचा.

सय्यद अली मोठे बहुभाषी गृहस्थ
लिहिण्या–वाचण्याचा दांडगा षौक !
सहाजिकच त्यांनी काय केलं ?
आपल्या नव्या घरातली लिहिण्या–वाचण्याची खोली
अगोदर बांधून काढली.
तिथं, आरामखुर्चीत पडल्या–पडल्या
मारे ऐटीत ते ताजं वर्तमानपत्र वाचायचे.
मी पण,
आमचा विटा वाहण्याचा पिढीजात धंदा सोडून
हळूच त्यांच्या मागं उभं राहून–चोरून, फुकटात
त्यांचा पेपर वाचायचा !
दुसऱ्याचं वर्तमानपत्र चोरून, फुकटात वाचायचा सद्‌गुण
मी तुमच्यापासूनच घेतलाय ! !
हळू हळू त्यांची आमची इतकी गट्टी जमली,
की मला येताना पाहताच
पेपरचं पहिलं पान ते माझ्यापुढं टाकायचे–
आणि स्वतःसाठी व्यापार विभाग, सिनेमा जाहिरातींची
पानं ते वाचायचे !
ठळक, ताजी बातमी वाचून मी म्हणे :
"अभिनेता XXX याला पद्‌मश्री !"
तर ते मला विचारीत :
"काय हो, ह्या XXX नं काय एवढा पराक्रम केलाय्,
म्हणून सरकारनं याला पद्‌मश्री दिलीय् ?"
म्हटलं :
"हे–हे तुमचं बरोबर नाही हं–

अहो, पद्मश्री XXX शी लग्न केलंय्
हा त्याचा पहिला पराक्रम !
आणि आजवर तिला सांभाळून आपल्याच घरात ठेवलीय्,
हा दुसरा पराक्रम ! !
आता त्यांच्या पाळण्यातल्या पोरासोरांना सुद्धा पद्मश्री देऊन
टाका म्हणजे हा पोरखेळ पूर्ण होईल–"
मी राजकीय बातम्या वाचायचा,
तर ते मधेच किंचाळायचे :
"सोन्याचा भाव आणखी वाढला–
म्हणजे, आमचा धंदा आता अगदी तेजीत चालणार म्हणायचा !"
अशी आमची गद्य जुगलबंदी चालायची.
होता, होता–त्यांची आमच्यावर एवढी विलक्षण मर्जी बसली
की एक दिवस ते चक्क मला म्हणाले :
"अफसोस यार– तू गद्धा नसतास,
तर खात्रीनं मी तुला दत्तक घेतला असता !"
सय्यदअलींचं घर बांधून झालं–
त्याच रात्री आमचा मालक ढब्बू कुंभार
यानं बेसुमार ताडी झोकली,
आणि माझ्या पाठीत दांडकं हाणीत तो म्हणाला
"चले जाव ! मला विटा वाहणारा गाढव हवाय्,
तुझ्यासारखा वर्तमानपत्र वाचणारा दीडशहाणा गाढव नकोय् !"
झालं !
निघालो–
रात्रभर थंडीत कुडकुडत, कुडकुडत
सय्यदअलीच्या घरी आलो

म्हटलं हे आपल्याला दत्तक घेणार होते
यांच्या घरी काम मिळेल
निदान आसरा तरी !
पण, कसलं काम आणि कसलं काय !!
पहातो तो रात्रीत ट्रान्स्फर सीन झालेला
हल्ला झाल्याकारणानं
सय्यदअली पार पाकिस्तानात पळून गेलेले !
बरं,
हल्ला करणारांचा पुढारी
लाहोरचा पळविलेला गद्धासिंह
मग सय्यदअलींच्या ग्रंथालयाची दुर्दशा काय विचारता—
शेक्स्पिअर गेला, आणि शहाळी आली !
खलिल जिब्रानच्या जागी खरबुजं,
बालकवींच्या जागी आलूबुखार,
केशवसुतांच्या जागी काकड्या—
आणि कृष्णचंद्राच्या जागी केळी !
माझ्या डोळ्यात पाणी आलं . . .
मला पहाताच तो नोकरावर खेकसला :
"अबे, या गाढवाच्या पाठीवर लादून दे ती रद्दी !"
आठ–दहा हेलपाट्यातच
त्यानं सगळे जागतिक कीर्तीचे लेखक
निकालात काढले !
म्हटलं,
जिथं ग्रंथांचा
आणि त्यात रमणाऱ्या आमच्यासारख्या महापंडितांचा

एवढा अनादर होतो,
तिथंच रहाण्यासारखा
माणूसपणा नाही दुसरा ! ! !
"चलो दिल्ली !"
ही घोषणा देणं सोपं आहे,
पण तिथं पोचणं महाकठिण !
कारण वाटेत अडचणी फार–
आता आमचंच पहा ना :
आमची स्वारी निघाली डुलत डुलत,
वाटेत एक गाव लागलं.
पहातो तो एक मुसलमान
बगलेत छोटंसं गाठोडं घेऊन
जिवाच्या करारानं धूम पळत सुटला होता.
म्हटलं, दमला असेल बिचारा
म्हणून त्याला घेतला पाठीवर आणि उचलला पाय !
"चला, आपल्यामुळे एका निरपराध माणसाचे प्राण वाचले–"
हा आमचा समाधानाचा सुस्कारा
हवेत विरतो न विरतोय् तोंच
समोरून हल्लेखोर हजर :
"पाह्यलंत ? ह्या मुसलमानानं हा गाढव
नक्कीच कुणातरी हिंदूचा चोरलाय् !"
त्यानं गयावया करून सांगितलं :
"अहो नाही–"
पण लक्षात कोण घेतो ?
हल्लेखोरांनी त्याला ठार मारलं !

त्यांच्यातल्या एकानं आमची दोरी धरली–
जरा पुढं गेलो
तो मुसलमानांचं गाव लागलं
तेहि तितकेच माथेफिरू :
"देखो, इसने यह गधा
हरगिज किसी मुसलमानसे चुराया होगा !"
त्यांनी त्या हिंदूला ठार मारलं.
मग मौलवीसाहेब माझी दोरी धरून
मला मशिदीकडे घेऊन चालले–
वाटेत मी त्यांची खूप विनवणी केली :
"हजरत, मला सोडा,–"
"तुला सोडू ? कसा सोडू ? अरे, तू तर काफर !"
"मी कसा काफर ?"
"नाहीस ? मग तू कोण आहेस ? बोल–
हिंदु की मुसलमान ?"
"हुजूर गाढवाला कुठला आलाय् धर्म ?"
"बकवास बंद ! बोल, तू हिंदु की मुसलमान ?"
"हुजूर, एकादा हिंदु किंवा मुसलमान गाढव असू शकेल,
पण एकादा गाढव हिंदु किंवा मुसलमान कसा काय असणार ?"
"बदमाष ! तू फार बोलायला लागलास–
थांब, घरी गेल्यावर तुला ठीक करतो !"
मशिदीबाहेर त्यांनी मला खुंटाला बांधून ठेवलं.
पुढची सगळी चित्रं मला स्पष्ट दिसायला लागली.
अंगात होती नव्हती तेवढी सगळी ताकद एकवटून
दोरी तोडली आणि धूम पळत सुटलो !

म्हटलं, आता वाटेत कुणीहि भेटो–
मग तो हिंदु असो,
मुसलमान असो, ख्रिश्चन असो
किंवा नवबौद्ध असो–
त्याला मदत म्हणून करायची नाही !
सावकाश, चरत चरत
दिल्लीला येऊन पोचलो. . .
इथं, तुम्हाला दिल्लीचा थोडा भूगोल सांगायला हवा.
ज्या दिवशी मी तिथं पोचलो,
त्या दिवशी अशी परिस्थिती होती :
पूर्वेला निर्वासित, पश्चिमेला निर्वासित
दक्षिणेला निर्वासित, उत्तरेला निर्वासित
मधे स्वतंत्र भारताची स्वतंत्र राजधानी !
जागोजाग
सिनेमांच्या जोडीला शक्तीवर्धक गोळ्यांच्या जाहिराती !
सभ्यता आणि संस्कृती यांचा प्राचीन वारसा ! !
म्हणजे, मी असा चांदणी चौकातून चाललो होतो
तर समोरून टांग्यात बसून
एक सुंदर तरुणी येत होती–
आणि ज्या पायदानावर तिनं आपली सुकोमल पदकमलं
टेकवली होती ना,
त्याच पायदानावर एक जाहिरात चिकटवलेली होती,
"असली शक्तीवर्धक गोलियाँ
इंदरसिंह जलेबीवालेसेहि खरीदिए !"
या भयानक विनोदावर खूष होऊन

मी एक लकेर सोडून दिली–
रस्त्याच्या मधोमध उभा राहून
एक गाढव ओरडतोय् हे पाहून
आजूबाजूचे लोक हसायला लागले. . .
ते हसत होते माझ्या बेढव आवाजाला,
मी हसत होतो त्यांच्या बेढब संस्कृतीला ! !
दिल्लीत प्रवेश करायला तसे पुष्कळ दरवाजे आहेत–
"दिल्ली दरवाजा"
"अजमेरी दरवाजा"
"तुर्कमान दरवाजा"
पण या एकाहि दरवाजातनं जायची–यायची सोय नाही !
कारण,
एकतर तिथं गायी–म्हशी 'पोहो' घालून बसलेल्या असतात,
नाहीतर, पोलिस–शिपाई
खाटा टाकून तंगडचा वर करून घोरत पडलेले असतात !
हां, आता या दरवाजांच्या डाव्या–उजव्या वाजूंना
चांगल्या पक्क्या सडका झाल्या आहेत,
त्यांच्यावरनं तुम्ही दिल्लीत प्रवेश करू शकता.
अहो, खुद्द इंग्रजांनीदेखील
इथं एक "इंडिया गेट" नावाचा दरवाजा बनवलाय्,
पण त्यातनं सुद्धा जाण्यायेण्याची सोय नाही !
मला वाटतं
आता लौकरच दिल्लीतल्या घराघरांचे दरवाजेदेखील
निव्वळ शोभेसाठी असतील,
आणि लोक डाव्या उजव्या बाजूंच्या खिडक्यातनं

उड्या मारून जा–ये करतील !
दिल्लीत नवी दिल्ली,
आणि नव्या दिल्लीत कनॉट प्लेस !
हे कनॉट प्लेस हे ठिकाण मोठं झकास आहे–
संध्याकाळच्या वेळी मी पाह्यलं :
लोक लोखंडी गाढवांवर बसून
तिथल्या गोल सडकांवर
गोल गोल चकरा मारताना दिसले !
माणूस नावाच्या द्विपाद प्राण्याला
गोल गोल गोष्टीचं जे आकर्षण
अगदी बालपणीच जडतं,
ते थेट मरेपर्यंत टिकत असावं !
शेळ्या–मेंढ्यांच्या कातड्यांचे कपडे घालणारे लोकहि
मला इथंच दिसले.
म्हटलं : माकडापासून उत्क्रान्त झालेल्या या प्राण्याला
इतक्या लवकर आमच्यात यायची
इतकी घाई झाली असेल,
याची मला कल्पना नव्हती !
बायकांनी ओठांना आणि नखांना
एकच रंग फासण्यातलं औचित्य तर आपल्याला
अजून कळलेलं नाही.
म्हणजे, आत्मार्पण आणि आत्मरक्षण
दोहोंचाहि रंग एकच कसा ?
बरं, आपले केस
त्या डोक्यावर अशा काही चमत्कारिक पद्धतीनं बांधून ठेवतात–

–म्हणजे दिल्लीतल्या श्रीमंत बायका बरं का–
की लांबून पहाणाराला वाटावं :
गाढवाचेच कान आहेत ! !
आमच्या सौंदर्याचा एवढा हेवा यांना वाटतो,
याची मला कल्पना नव्हती !
म्हटलं, चला– डोळ्यांचा उपास सुटला,
आता जरा पोटाचा उपास सोडावा.
कारण गेल्या कित्येक तिथींना
मला एकादशीच घडली होती !
"इंडिया गेट" पाशी आलो–
चोहोकडे कसा मुबलक हिरवागार घास पसरला होता.
पोटभर ताव मारला–
'अऽबऽऽ' ढेकर दिला,
आणि मान वर केली,
तर पाठीत दण्डा !
"ओय् !" वळून पहातो– तो पोलिस :
"हा–हा–हा कंबख्त गाढव
इथं कशाला घुसलाय ?"
म्हटलं : "का ? गाढवांनी फक्त पार्लमेंटातच बसावं,
असा कायदा आहे की काय ?"
गाढवाला वाचा फुटलेली पाहून
त्या पोलिसाची वाचाच गेली !
थोड्या वेळानं भानावर आल्यावर
तो मला घेऊन पोलिस–चौकीवर निघाला
आता कल्पना करा :

पोलिस चौकीत एक गाढव घुसतोय् म्हटल्याबरोबर
तिथला तो हेडकॉन्स्टॅबल भडकला :
"रामसिंग, याला इथं कशाला आणलंस ?"
"हुजूर गाढव !
सॉरी–म्हणजे–हा गाढव आहे !!"
"ते काय मला दिसत नाही ?
का, माझे डोळे फुटलेत ?"
"हा इण्डिया गेट पाशी खुशाल चरत होता, हुजूर–"
"रामसिंग, तुझी अक्कल तर कुठं गेली नव्हती ना
घास खात चरायला ?
या मुक्या बिचाऱ्या गाढवाला इथं कशाला आणलंस ?"
"हुजूर, हा मुकाहि नाही,
आणि बिचाराहि नाही–
अहो, तो चांगला बोलतो !"
"रामसिंग, सक्काळीच झोकून ड्यूटीवर येणं तुला शोभतं का ?"
आता मात्र मला हस्तक्षेप करणं भागच होतं–
म्हटलं :
"हेडकॉन्स्टेबल साहेब, हा सांगतोय् ते बरोबर आहे !"
माझ्या तोंडून एवढं ऐकलं मात्र–
आणि
भूत दिसल्यासारखा हेडकॉन्स्टेबल
खुर्चीवरनं ताडकन् वर उडाला !
बाकी त्याचं आश्चर्य काही अनाठायी नव्हतं
कारण,
या दिल्लीत मोठमोठ्या खुर्च्या अडवून बसलेले,

आणि माणूस असून गाढवासारखं बोलणारे
पुष्कळ लोक त्यानं पाहिले होते !
पण
गाढव असून माणसासारखं बोलतोय्,
हे पहायची मात्र त्याची ही पहिलीच वेळ होती ! !
आता काय करावं,
हे न कळून त्यानं डायरी काढली.
आणि रागारागानं माझी जबानी घ्यायला लागला
"तुझं नाव ?"
"गाढव !"
"बापाचं नाव ?"
"गाढव ! !"
"त्याच्या बापाचं नाव ?"
"गा–ढ–व ! ! !"
"अरे–यह क्या बकवास है ?
सगळ्यांचं नाव एकच कसं ?
आता माझंच पहा :
माझं नाव ज्योतिसिंग,
बापाचं नाव प्यारेलाल,
त्याच्या बापाचं नाव जीवनदास !
तू नक्की खोटं बोलत असला पाहिजेस–"
"नाही हुजूर,
इतक्या लहान–सान बाबतीत खोटं बोलायला,
मी काय पोलिस आहे ?
आमच्यात अशी चाल आहे :

जे बापाचं नाव, तेच पोराचं !"
"त्यात काय फायदा?"
"नाही—म्हणजे, वंशावळ पटकन् सापडते !
आता समजा—
मी आपल्याला विचारलं
आपल्या पंधराव्या पितराचं नाव काय ?
तुम्ही सांगू शकाल ?"
"पंधराव्या ? नाही बुवा—"
"अहो, मला विचारा ना—
पंधराव्याच काय, पण थेट पंधराव्या शतकातल्या पितराचं
नाव विचारा—
सांगू ?
श्री गाढव !
आता बोला—
तुमच्या—आमच्यात जास्त प्रतिष्ठित घराणं कुणाचं ?"
ज्योतिसिंगाचा संशय क्षणाक्षणाला वाढत होता.
रामसिंगाच्या कानाला लागून तो म्हणतो कसा :
"अरे रामसिंग, हा गाढव नसला पाहिजे !
हा कुणीतरी परदेशी हेर
गाढवाचं कातडं पांघरून राजधानीत हिंडतोय्—"
"बरोब्बर !
साल्याची चामडी खोलून बघितलं पाहिजे—
आत कोणता परदेशी हेर दडून बसलाय्"
"हां—हां— पण चामडी खोलायची,
म्हणजे सब्—इन्स्पेक्टरसाहेबांची ऑर्डर पाहिजे !"

"मग चला–"
अशी आमची वरात सब्-इन्स्पेक्टरच्या खोलीत आली,
या सब्-इन्स्पेक्टर चाननरामच्या मिशांचे आकडे
विंचवाच्या नांगीसारखे ताठ होते !
२५ वर्षांच्या सर्व्हिसमध्ये
त्यांना हसताना कुणी एकदाहि पकडलं नव्हतं !
"अस्सं ! एकूण तू पाकिस्तानी हस्तक आहेस तर–"
मी गप्प उभा होतो.
"बोलत नाहीस का–
मग तू खात्रीनं, चीन किंवा रशियाचा
एजंट असला पाहिजेस !"
आता तर मी बोलणंच शक्य नव्हतं.
मला बोलतं करण्याकरता
हा चाननराम
मला चिडून चिडून लाथा बुक्या मारीत होता–
पण माझ्यापेक्षा त्यालाच जास्त लागत होतं !
चाननरामला घाम फुटला,
तेव्हा मला कंठ फुटला !
सुखदु:खाच्या उत्कट क्षणी शब्द अबोल होतात
आणि
आत्म्याची वीणा नकळत सुरेल सूरावर छेडून जाते !
माझी ती 'आसावरी' ऐकताच
चाननराम आपल्या दोस्तांना रागारागानं म्हणतो कसा =
"अरे हा तर चक्क गाढव
आणि तुम्ही म्हणताय् की परदेशी हेर आहे म्हणून ?

काय थट्टा-मस्करी करता की काय माझी ?
थांवा, आत्ताच्या आत्ता डिस्मिस् करतो एकेकाला–"
"नाही हुजूर,
आता हा बाहेरच्या खोलीत चांगलं बोलत होता"
"झोपेत आहात झोपेत !
डोकी बिघडलीत तुमची–
जा याला कांजीहाऊसमध्ये कोंडून टाका
आठ दिवसात कुणी आलं नाही–
तर लिलावात फुंका ! जा–"
म्हटलं,
बोलाचं मोल या व्यवहारी जगाच्या रूपेरी ताजव्यात
कितीहि मोठं असलं,
तरी मुक्याचं व्रत
हीच कधी कधी सोन्याची खाण ठरते !
आज जर का मी इथं एक शब्द बोललो असतो,
तर खऱ्या परदेशी हेरांना 'मुक्तांगण' देणाऱ्या
याच मंडळींनी
माझ्या आतमध्ये मात्र कोणता परदेशी हेर दडून बसलाय्
हे पाहण्यासाठी
खात्रीनं माझी मान कापली असती.
कांजी–हाऊसमध्ये आठ दिवस मजेत गेले.
कुणी आलं नाही–
येणं शक्यच नव्हतं !
मग लिलावात रामू धोब्यानं मला विकत घेतलं.
मी निघालो– त्याच्या मागोमाग,

यमुनापार,
कृष्ण नगर–
या रामू धोब्याच्या घरी
मला अगदीं मरे मरेपर्यंत राबावं लागे.
घरून घाटावर आणि घाटावरून घरी!
वाटेत एका ग्रंथाची गाठ पडत नसे
की वर्तमानपत्राची डोळेभेट होत नसे–
अरे, म्हणजे जगात चाललंय् काय?
विज्ञानाची प्रगति कुठवर आलीय्?
चंद्रावर पोचलेला माणूस
शेजाऱ्यावर कधी प्रेम करणार?
सिनेमा सृष्टीतलं सगळ्यात ताजं लफडं कोणतं?
x x x कुमारीचा नवा आणि नववा घटस्फोट कुणाला?
काहीच कळत नव्हतं!
मनाची कशी उलघाल, उलघाल होत होती!!
आता रामूचा आणि संस्कृति–सौंदर्याचा संबंध म्हणाल,
तर घाटावरनं घरी येताना
वाटेत लागणाऱ्या थेटरातल्या पोस्टरपुरताच!
कारण
खिशात खुळखुळणाऱ्या खुर्द्यातनं सिनेमाचं तिकीट काढावं
की, रोटीसाठी आटा न्यावा,
या विचाराच्या आटयापिटयातच
बिचाऱ्याचा जीव मेटाकुटीला येई!
एक दिवस मात्र रामूनं चक्क ताडी पण झोकली
आणि सिनेमाचं तिकीट पण काढलं!

खेळ सुटल्यावर माझ्या पाठीवर बसून
रामू मारे ऐटीत गाणं गात निघाला :
"आगे भी जाने ना तू
पीछे भी जाने ना तूऽऽ"
मंडळी,
वास्तविक हे गाणं गायचा अधिकार माझा होता !
कारण
त्यालाच मागची पुढची काही शुद्ध नव्हती !
आजवर तो मला घरचा रस्ता दाखवी,
आज मी त्याला दाखवला !
घरी गेल्यावर मात्र त्याच्या उपाशी बायकोनं
जी काही धमाल उडवून दिली,
तिनं रामूची सगळी नशा
जागच्या जागी जिरली–
ताडीची पण आणि सिनेमाची पण !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
बाल वाङ्मय विभाग
क्र. ...६९०... दिनांक
विषय ...कि२।१२. क्र...३८

---

मग रामूनं माझ्यावर दण्डा उगारला–
बरोबरच आहे,
सध्याच्या सोशालिस्टिक् पॅटर्नच्या सोसायटीत
त्यानं माझ्याखेरीज दुसऱ्या कुणावरहि
दण्डा उगारला असता
तर लगेच चोहोबाजूंनी
"अहिंसा, अहिंसा"
असा सात्विक आणि तात्त्विक ओरडा झाला असता ना !
हा रामू एक दिवस यमुना नदीत कपडे धूत उभा होता.
इतक्यात मगरीनं त्याचा पाय खेचला–

वेळ भर दुपारची.
पुलावरनं पुष्कळ लोक जात येत होते
पोलिस शिपाई नाक्यावर ड्युटी करीत उभा होता
पण
मरणाऱ्या धोब्याला वाचवणं
हे काही त्याच्या ड्युटीत बसत नव्हतं !
रामूनं खूप आरडा ओरडा केला,
पण मगरीनं त्याचं बिलकुल ऐकलं नाही . . .
रामूला मगरीनं खाल्लं,
या दुर्घटनेबद्दल दुसऱ्या दिवशी
प्रत्येक गिऱ्हाइक हळहळलं,
पण प्रत्येकजण शेवटी म्हणायचा :
"रामू तसा फाऽऽर चांगला धोबी होता हो–
पण आमची ती शिफॉनची साडी गेली–भारीतली !
ती नवी सॅटिनची सलवार
नुकतीच शिवून आणली होती–
अप्–टु–डेट
त्या अमक्या तमक्याकडनं . . ."
मंडळी,
आम्हा गाढवांच्या समाजात
असं कुणी अचानक अपघातानं मेलं,
तर दुसऱ्याच दिवशी
त्याच्या विधवा बायकोला इतकं कुणी छळीत नाही !
रामूच्या बायको-मुलांना तीन तीन दिवस उपास पडायला लागले
तेव्हा मी म्हटलं :

"हे बरोबर नाही.
आता आपलं सरकार आलंय्,
नको नको त्यांना ते मदत देतंय्–
मग आपण अर्ज करायला काय हरकत आहे ?"
आता सरकार–दरबारी अर्ज करायचा होता
म्हणून म्हटलं,
म्युनिसीपालटीपासून सुरुवात करू !
अर्ज घेऊन मी कृष्णनगर म्युनिसीपालिटीत दाखल झालो.
पहातो तों,
तिथले कारकून, हेडक्लार्क
दोस्त मंडळींना जमवून,
टेबलावर रजिस्टर उघडं ठेवून
पत्त्यांचा डाव मांडून ब्रिज खेळत बसले होते ब्रिज !
हळूच मी हेडक्लार्कच्या मागं उभा राहून म्हटलं :
"हुजूर, मोठा बाका प्रसंग आलाय्–"
मागं वळूनदेखील न पाहता,
त्यानं माझं म्हणणं मान्य केलं
"पहा ना–
हे पान टाकलं तर एक रंग कटाप होतो,
हे पान टाकलं तरी पंचाईत ! बरं–"
"हुजूर !"
मी त्याला मधेच अडवीत म्हटलं–
"रामू धोबी मेलाय् !"
"मरु दे रे बाबा,
इथं आमचा हुकुमाचा राजा मरु घातलाय्–

आणि या गाढवाला धोब्याची काळजी !"
असं म्हणून त्यानं मागं वळून पाह्यलं मात्र,
आणि आपल्या वाक्यातलं गाढव
साक्षात् समोर उभं आहे,
हे पाहून त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली !
घाईघाईनं मला तो म्हणतो कसा :
"अरे, जिथं ही दुर्घटना घडली ना,
तो घाट आमच्या हद्दीत येत नाही–
तू आपला टाऊन हॉलमध्ये जा कसा !"
मी टाऊनहॉलकडे निघालो,
आणि ती कर्तव्यदक्ष मंडळी पुन्हा
'अंज लाल, अठ्ठ ईंट'
करीत पत्त्यात रमली !
टाऊन हॉलचा रस्ता होता पुलावरनं–
पुलावर पोलिसांनी हटकलं :
"ए गाढवा–कुठं चाललास ?"
"टाऊन हॉल !"
"तुझा मालक कुठाय् ?"
"मला मालक नाही ! आजपासून आपण आझाद ! !"
"अरे वा वा वा–आझादी मिळाली,
म्हणजे मालकी संपली की काय ?
कुणीतरी तुझा मालक असलाच पाहिजे–
बोल, तू कुणाचा हुकूम मानतोस ?"
"काय रे, तू कुणाचा हुकूम मानतोस ?"
"म–म–मी ? हेडकॉन्स्टेबलचा–"

"हेडकॉन्स्टेबलच्या वर कोण असतं ?"
"इन्स्पेक्टर, डी. एस्. पी.–ही मालिका थेट
होम सेक्रेटरी पर्यंत जाऊन पोचते !"
"बरं, होम सेक्रेटरीच्या वर कोण ?"
"ज्याअर्थी त्याला पगार मिळतो स्टेट बँकेतनं,
त्याअर्थी स्टेट बँक !"
"स्टेट बँकेच्या वर काय असतं ?"
"बँकेत असतो पैसा, त्या अर्थी पैसा !"
"बरं, काय रे–या जगात
पैशाहून श्रेष्ठ काय असतं ?"
आता मात्र तो भलताच विचारात पडला.
मी त्याला म्हटलं :
"तू विचार करून ठेव,
तोंवर मी टाऊनहॉलमधे जाऊन येतो !"
टाऊनहॉलमधलं एकंदर वातावरण पाह्यलं,
आणि मनाशी ठरवलं :
इथं फाड फाड इंग्रजी बोलल्याशिवाय
आपला निभाव लागणार नाही !
कारण
साहेब जाऊन पंचवीस वर्षं होऊन गेली असली,
तरी इथली माणसं फक्त इंग्रजी बोलणारांशीच
उठून वाकून अदबीनं बोलतात.
इन्क्वायरी क्लार्कला
मी लुसलुशीत, बोवड्या इंग्रजीत विचारलं :
"Where's Chairman's office ?"

एक अस्सल देशी गाढव
फर्डं इंग्रजी बोलतोय् हे पाहून
ती कढीजाद कारकुनाची अवलाद
खुर्चीवरनं ताडकन उडाली, आणि
आपली टाइट पँट मागच्या बाजूला शाबूत असल्याची
खात्री करून घेऊन
कित्येक वर्षांत प्रथमच उठून वाकून अदबीनं
आणि आपल्या पँट इतक्याच बेतशीर इंग्रजीत तो म्हणाला :
"up, up Go by lift—
अरे, अरे, साहेबांना म्हणावं :
या गाढवाला चटकन् लिफ्ट द्या!"
लिफ्टपाशी माणसांची भली मोठी रांग–
तिच्याकडे दुर्लक्ष करून
मी V. I. P. च्या थाटात लिफ्टमध्ये शिरलो!
लिफ्टमननं फटकन् दरवाजा बंद केला.
आतमधे पाटी होती :
"सहा माणसांसाठी!"
मंडळी,
आयुष्यात पहिल्यांदा माझ्या ध्यानात आलं :
सहा माणसं = एक गाढव!
चेअरमन साहेबांच्या चपराशाला रुबाबात सांगितलं :
"Go and tell him म्हणावं mister donkey
of बाराबंकी, आले आहेत!"
तावडतोब बोलावणं आलं– इंग्रजीचा परिणाम!
आत गेल्यावर साहेबांना आणखी एक स्टायलिश्

'गुड मॉर्निंग ठोकला,
आणि मान वर करून पाह्यलं,
तर त्यांच्या डोळ्यात अशी एक विलक्षण धूर्त चमक
दिसत होती की जी
कमीत कमी पाच सहा निवडणुका खेळल्याखेरीज येत नाही ! !
मला पाह्यल्याबरोबर ब्रह्मानंद झाल्यासारखे
साहेव म्हणाले :
"या, या, या– अरे पण,
मला भेटायला येताना तुम्हाला हे एवढं
गाढवाचं सोंग घ्यायची जरुरी नव्हती लाला संतरामजी !"
"मी कुणी लाला संतराम नाही,
खरा खुरा गाढव आहे !"
"सोडून द्या हो–
मागच्या निवडणुकीत तुम्हाला कुणी आपटी दिली,
तेवढं सांगा–
काँग्रेस, जनसंघ, कम्युनिस्ट,
प्रसोपा, संसोपा की साधा सोपा ?"
"तसलं काहीएक झालेलं नाही–"
"नाही ? छान, छान– मग लालाजी,
आधी आम्हाला वचन द्या–
उद्या अध्यक्षपदाची निवडणूक आहे,
तेव्हा तुमचं मत आम्हालाच मिळालं पाहिजे !"
त्यांनी हात पुढं करताच
मी आपला कान पुढं केला !
त्यांनी तो जोरजोरानं हलवला,

तेव्हा त्यांच्या लक्षात आलं
की मी काही कुणी बहुरुपी नाही—
खराखुरा गाढव आहे!"
सत्याची जाणीव होताच,
'सत्यमेव जयते'चा तो वर्षानुवर्षांचा ठेकेदार
चांगलाच भेदरला,
त्याच्या तोंडातली सिगरेट खाली पडली
आणि टेबलावरचे कागदपत्र जळायला लागले...
"मी तुम्हाला लाला संतराम समजलो."
"म्हणजे, मी त्यांच्यासारखा,
I am sorry,
ते माझ्यासारखे दिसतात की काय?"
"त्याची काय गंमत आहे :
काही लोक बाहेरून गाढव दिसले तरी
आत पक्के बेरके असतात!
काही लोक वरून कितीहि स्मार्ट दिसले तरी
त्यांनी तोंड उघडताच आतलं गाढव उघडं पडतं!!
आता मी असा विचार केला
की तुम्ही जर अंतर्बाह्य गाढव असलात,
तर माझं अध्यक्षपदाचं आणखी एक मत
आजच पक्कं झालं— आता बोला!"
म्हटलं,
"तो रामू धोबी मेलाय्"
"मरु दे रे बाबा,
दिल्लीतले एकूण एक धोबी मेले तरी मला काय त्याचं?

मला आधी ही आग विझवली पाहिजे!"
आग खरोखरच वाढत चालली होती.
चेअरमनसाहेबांनी "घण घण" घंटा बडवली,
शिपाई इकडून तिकडे धावू लागले,
टेलिफोन खणखणू लागले–
मी मागच्या जिन्यानं खाली खसकलो!
हो! म्हटलं, आग लावल्याच्या आरोपावरून
हे अटकेत टाकायचे– ह्यांचा काय नेम!
खाली आल्यावर आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आली :
खाली यायला कुणालाही 'लिफ्ट' लागत नाही!
'इन्क्वायरी'तल्या एका कारकुनाला
रामू धोब्याची कथा आणि त्याच्या बायको-मुलांची व्यथा ऐकवली.
ती ऐकताच त्यानं–
"भांडवलशाही समाजव्यवस्था!"
"अमानुष पिळवणूक!"
"सामाजिक अन्याय!!"
ह्यांना शिव्यांची आणि डाव्यांची लाखोली वाहून,
माझ्या कानाशी लागून तो म्हणतो कसा :
"दोन रुपये देता का– दोन रुपये?"
"अरेच्या, कमाल झाली!
माझ्यासारख्या निराधार गाढवाजवळ
दोन रुपये लाच मागताना, लाज नाही वाटली तुला?"
"नाही!!"
"असं का?"
"कारण,

being a Royist, originally I am a Marxist
by conviction ;
a reformist by action;
and a typist by profession !"
मनाशी म्हटलं,
'आता मुंबईत एकाद्या मारवाड्याला दैनिक पत्र काढायचं असलं,
तर याला मुख्य संपादक नेमायला हरकत नाही !'
"बरं, बाकीचं राहू द्या–
आमच्या रामूला मदत कुठं मिळेल तेवढं सांगा."
"तुम्ही असं करा–
पुनर्वसाहत खात्यात अर्ज करा,
तिथं देतात तुमच्यासारख्यांना मदत !"
चौकशी करीत करीत पुनर्वसाहत खात्यात येऊन दाखल तर झालो.
हा भला मोठा दिवाणखाना.
मधोमध तिवईवर ठेवलेला लॅस्टिकचा पुष्पगुच्छ
आणि
कोपऱ्यातल्या टेलिफोन एक्सचेंज जवळ बसलेली एक सुंदर युवती !
ही सुंदरी आपल्या नखांना रंग लावण्यात
इतकी मश्गुल होऊन गेली होती,
आणि तिच्यासमोर लिप्स्टिक, क्रीम, पावडरी
यांच्या डब्या अशा काही विखुरल्या होत्या
की मला वाटलं :
आपण चुकून पुनर्वसाहत खात्यात यायच्याऐवजी
जॉनसन अॅण्ड जॉनसन कंपनीच्याच शो-रूममध्ये येऊन
दाखल झालोत !
माफी मागून मी वळणार

तोंच त्या नख–सुंदरीचं माझ्याकडे लक्ष गेलं
आणि विलक्षण लाडिक सुरात ती म्हणाली–
"Yes–please !"
"मदत मागायला आलोय्–"
तिनं सफाईदारपणे 'स्विच' दावलं.
इथं एक गंमत झाली :
टेलिफोनच्या दोन्ही बाजूंचं मला स्वच्छ ऐकू येत होतं–
सिनेमात दाखवतात ना तसं !
कदाचित्, हा आमच्या लांब कानांचाहि परिणाम असू शकेल !
"रामलुभाया, तुम्हाला भेटायला कुणी आलंय्–"
"ही काय कटकट सवकाळीच !
मी आता ताजा पेपर वाचतोय्,
एकीकडे लस्सी पितोय्–"
"हॅलोऽ कोण ?"
"मी निर्मला–"
"हाय मेरी जान–"
असं म्हणून तो रेड्यासारखा रेकला !
"ऐकून घ्या– इथं एक गरीब याचक–"
"नको नको ! रोज रोज तेच तेच रडगाणं ऐकून
माझे कान किटलेत !
आणि याचक म्हणशील तर एंका अर्थानं आम्हीदेखील याचकच
आहोत– तुझ्या प्रेमाचे !
निमा–निम्मी–येणार ना संध्याकाळी सिनेमाला ?"
त्या निम्म्याशिम्म्या सुंदरीनं
हा फुकटातला सिनेमा थोडक्यात संपवला . . .

गालांवर पावडर थापली आणि
सुपरिंटेंडंट–साहेबांशी संपर्क साधला–
–म्हणजे फोनवरनंच–!
लगेच तिकडून आवाज आला :
"नाही, नाही निर्मला !
मला आता बिलकुल वेळ नाही–
काहोटेंचे सरदार दरबारासिंग बसलेत ना इथं
मिलिटरी कॉंट्रॅक्टर– बिचाऱ्यांचं सर्वस्व लुटलं गेलंय् !
त्यांच्या एक लाखाच्या क्लेमचा आत्ताच निर्णय द्यायला हवा–
निर्मला, तू असं कर :
त्यांना दे सुपरिंटेंडंट साहेबांकडे पाठवून–
नाहीतरी हल्ली त्यांना काय काम असतं ?"
आता ह्या साहेबांना काम फार म्हणून निर्मला 'स्विच' दाबणार,
इतक्यात पुन्हा त्यांचा घोगरा आवाज आला :
"निर्मला कालची ती साडी आवडली का ?"
"हो, तीच तर नेसून आलेय्–"
असं म्हणून पर्समधल्या नखाएवढ्या आरशात बघून
तिनं खात्री करून घेतली :
तीच साडी नेसलीय् की नाही !
मग ओठावर लिप्स्टिक–
सुपरिंटेण्डण्ट साहेबांना फोन :
"हे पहा–"
"आता फोनवरून कसं पाहू तुझ्याकडे ?
जरा इकडे ये ना !"
या रोजच्या विनोदावर ती रोजच्या सारखंच खळखळून हसली,

आणि म्हणाली :
"आज काही लाडी गोडी चालायची नाही हं–
दोन मिनिटं तुम्हाला याच्याशी बोललंच पाहिजे !"
"अग कोण आहे तो ?
तुझ्या वशिल्याचा ?"
"आहे एक गाढव–"
हे ऐकल्यावर सुपरिंटेण्डण्ट साहेबांनी आधी सात मजली
हसून घेतलं आणि मग ते म्हणाले :
"आणि जरी नसला तरी तू त्याला पाठवून दे ना
माझ्या चेंबरमध्ये– अग, मी बनवतो ना त्याला गाढव–
त्याचे दोन्ही कान ओढून !"
आमची स्वारी आत गेल्यावर मात्र साहेबांची दारुण निराशा झाली.
कारण, आधीच हे एवढे लांब असलेले कान
ते आणखी काय उपटणार होते !
शिवाय, माझे कान उपटायला मी काही
त्यांच्या हाताखालचा कारकून नव्हतो !
रागारागानं त्यांनी मला विचारलं :
"तुम्ही पाकिस्तानातून आलात ?"
"नाही !"
"हे पहा पाकिस्तानात सर्वस्वी लुटलं गेलेल्यांनाच इथं
मदत मिळते !"
"आणि हिंदुस्थानात सर्वस्वी लुटलं गेलेल्यांनी कुठं जावं ?"
"त–त–ते तर मला देखील ठाऊक नाही !"
साहेबांनी चपराशाला हाक मारली.
आता चपराशाचे धक्के खाण्याऐवजी मी माझ्या पायानंच

बाहेर पडलो.
माझ्या चेहऱ्यावरचे निराश भाव पाहून
निर्मलेनं मला कामगार खात्यात अर्ज करायचा सल्ला दिला.
त्यावेळी तिच्या चेहऱ्यावरचे जे निर्मळ हास्य उमटलं होतं,
ते पाहताच
मघाच्या सगळ्या सुखसंवादांची मी तिला उदार मनानं क्षमा केली!
म्हटलं :
म्हाताऱ्या आईसाठी,
अपंग पतीसाठी,
एकुलत्या एका लेकरासाठी
रावणाऱ्या आमच्या कितीक मायबहिणींच्या वाटचाला
ह्या पुरुषप्रधान समाजात असली विटंबना येत असेल !
कामगार खात्याचा सेक्रेटरी–
P. Q. रंगाचारी
त्यानं माझा अर्ज पहिल्यापासून शेवटपर्यंत—
Most carefully वाचला !
आणि मग Joint Secretary
Y. Z. सुब्रह्मण्यम् ला बोलावून घेतला
तो आला लुंगी सावरीत सावरीत–
"येन्न स्वामी, येन्न समाचार ?"
"स्वाऽमी ! एक धोबी मेलाय्
आणि त्याचा गाढव आमच्याकडे मदत मागायला आलाय्–"
"Understood !"
"Oh no ! but the legal point is
गाढव कोणत्याहि सरकारी खात्यात जाऊ शकतो का ?"

"No, no– unless he is a direct recruit!"
"कोर्टात देखील न्याय मिळतो–तो माणसाला! गाढवाला नव्हे–"
"Even though the law is supposed to be an ass!"
"येन्न स्वामी, What is the legal
and fundamental difference between
an ass and a donkey?"
"It is very easy to recognise–
particularly during the election–period–
If elected for an assembly an Ass;
and for parliament a Donkey!"

मी म्हटलं :
"अहो मिस्टर अंडु गुंडू,
हे तुमचं काय चाललंय् ?
प्रश्न माझ्या गवतचाऱ्याचा नसून रामू धोब्याच्या
वायको–मुलांच्या अन्नपाण्याचा आहे–"
"हां स्वामी,
This point can be given the most sympathetic
consideration...Meanwhile स्वामी give me a pinch
of that panforised substance to totorise my
nostrills!"
तपकिरीची बचकभर चिमूट नाकपुड्यात कोंबूनदेखील
ह्या प्राण्यांना शिंक कशी येत नाही,
याचा अचंबा करीत–

आणि मला स्वत:ला येणाऱ्या शिंका आवरीत
मी त्यांचा तो important dialogue ऐकू लागलो!
बराच वेळ ते मला न समजणाऱ्या भाषेत

'गुडुगुडू' 'गुडुगुडू' बोलत होते,
मधून मधून माझ्याकडे पाहात होते–
"मोठमोठ्या कुटुंबाचे guardian म्हणवणारे गद्धे आपण
पाहिलेत–"
"But this chap looks a bit sincere–"
"येन्नस्वामी, पोडामिट्टी ? कोट्टायम्म ?"
"हो हो–हल्ली पोटापाण्याचा प्रश्न फारच कठीण झालाय्"
माझं उत्तर ऐकून ते दोघे मद्रासी 'थडथड' करून
इतके हसले की शेवटी रंगाचारीला सुब्रम्हण्यम्ची
लुंगी धरून ठेवावी लागली !!
"But स्वामी the point is –
धोबी हा कामगार आहे का ?"
"Not at all !"
मी म्हटलं :
"धोबी कामगार नाही मग कोण ?
सकाळपासून संध्याकाळपर्यंत राबतो तो– आणि कामगार नाही ?"
"Come here, look"
त्यानं जाडजूड ग्रंथ काढीत मला म्हटलं–
"read Article 'A'
read with capital 'S', as well as small 's'
clearly and unambiguously states :
कारखान्यात काम करतो– तो कामगार !"
म्हटलं– "बरोबरच आहे– तुमचं Article "ASS" दुसरं काय
सांगणार ?"
"धोबी हा कामगार नाही, तर आहे कोण ?
"Correct ! ह्या प्रश्नाचा निकाल लागलाच पाहिजे !

नाहीतर रोज तिकडं घाटावर धोबी मरायचे आणि रोज
आमच्यापुढं प्रश्न उभा रहायचा– गाढवाच्या रुपानं !
that won't do !
हो, मंत्र्यांना काय ? ते आज आहेत, उद्या नाहीत !
but we are here permanently settled to solve
such intricate and delicate problems !
मला वाटतं– या गाढवाचा अर्ज घेऊन ठेवावा,
आणि त्याची एक फाईल सुरू करून द्यावी !"
अशा फायली सुरू करून देण्यात या दक्षिणात्य रत्नाचा हात
कुणीहि धरणं शक्य नव्हतं !
त्याच्या या सद्‌गुणाबद्दल त्याला "दक्षिण भारत–रत्न !'
वर्ग ९ वा !' अशी पदवी द्यायचा विचार
'सेंट्रल सदाचार समिति' करीत होती,
पण दरम्यान, सामूहिक अनाचार इतका माजला
की तो विचार तेवढ्यावरच राहिला !
बाकी, सेंट्रल आणि स्टेट लेव्हलवर समित्या स्थापून
सदाचार कसा वाढणार, हा एक संशोधनाचा विषय आहे . . .
पण म्हटलं– चला, आपला अर्ज हा घेऊन ठेवतोय् :
"Thanks, Thanks ! many many thanks ..
basketful घास ! . . . बरं, मग आपला निर्णय ऐकायला
मी पुन्हा केव्हा येऊ ?"
"तुम्ही ना ? या दहा वर्षांनी–"
"दहा वर्षांनी ? आणि तोंवर रामू धोब्याच्या बायको-मुलांनी
खावं काय ?
"we can'nt help . . . ."

"स्वामी, The point is धोबी कामगार आहे की नाही,
हा मुख्य प्रश्न नसून
त्याला मारलं कुणी– हा मुख्य प्रश्न आहे !"
"Correct! त्याला मारलं कुणी ?"
"मगर–मगरीनं–"
'मगर' हा शब्द ऐकल्याबरोबर ते दोघं मद्रासी माझ्या अंगावर तुटून पडले :
"मगर–मगर does not come under the
Jurisdiction of our labour department ! you go
to the fisheries dept. !"
"Thank god, at last the problem is solved–"
"to the satisfaction of both !"
मी म्हटलं : "both of them !"
आणि मी मच्छिमार खात्याकडे वळलो . . .
मच्छिमार खात्यात मासळी–बाजाराइतकाच गलका !
वरं, सरकारी कारभार यंत्रणेशी आतापर्यंत झालेल्या
परिचयावरनं ठरवलं
की पहिल्या खिडकीपासूनच सुरुवात करावी
"इथं फक्त माशांच्या अंड्यांच्याच फायली आहेत–
पाटी नाही वाचता येत ?"
पहिली खिडकी खेकसली !
घाईघाईनं पुढं सरकलो आणि दुसऱ्या खिडकीला अर्ज सादर
केला– एकीकडे पाटी वाचू लागलो . . .
तोंच ती खिडकी किंचाळली :
"अहो, पाटीकडेच काय पहाता ?"

"नाही, नाही– आता तुमच्याकडेहि पहातो !"
"इथं तर बाई तीनच प्रकारची मासळी आहे–
रोहू, सायमन आणि पाप्लेट ! तुमच्या अर्जात काय नाव
आहे म्हणालात ? रामू ? अय्या रामू नावाची तर कोणतीच
मासळी नाही बाई माझ्याकडे ! आता काय करावं बाई !!"
"म्हणा हरी हरी !"
"काय म्हणालात ?"
"नाही– तुम्ही जिंकलात, आम्ही हरलो !"
तिसऱ्या खिडकीला अर्ज सादर करताच
आतून सत्यनारायणाची पूजा सांगावी तसा पाठ सुरू झाला :
"शार्क माशाचं तेल– पंचवीस रुपये लिटर !
जपानी ट्रॉलरचं भाडं– वर्षाला साठ –
सहा महिन्यासाठी देत नाही–
हा घ्या फॉर्म– भरा तिथं बसून–
लिहिता येत नसलं, तर कारकुनाच्या हाताला हात लावा–"
"अहो शार्क भट !–"
तर पुन्हा "शार्क माशाचं तेल" फसकन् माझ्या
तोंडावर उसळलंच !... मग त्याच्याच फॉर्मनं तोंड
पुसलं आणि पुढं सरकलो.
चौथ्या खिडकीला मात्र ठणकावून सांगितलं :
"एका धोब्याला एका मगरीनं खाल्लंय् !"
"मग त्यात काय झालंय् ? सगळेच धोबी मासे खातात !"
"अहो विद्वान, धोबी मासे खातात हा प्रश्न नसून
इथं धोब्याला मगरीनं खाल्लंय्– मगर– मगर–"

हा आमचा आरडा ओरडा ऐकून पाचव्या खिडकीवरचा
अँग्लो–इंडियन तिथं धावन्या–घुबन्या आला :
"मगरं–मगरं–व्हेअरं ?"
त्याला वाटलं सरकारी कचेरीतच मगर घुसलीय्
"मगरं–कृष्णनगरंऽऽ ! रेल्वे पुलाजवळ–घाटापाशी !"
"किती लांब आहे ?"
"घाट असेल पन्नास–साठ यार्ड–"
"च् च्– घाट नाही हो– मगर–मगर किती लांबीची आहे ?"
"असेल तीस एक फूट–"
"तीस फूट ? वा : वा : – चला, काढू बंदूक ?"
"बंदूक कशाला ?"
"तुम्ही मगरीच्या शिकारीला निघालात ना ?"
मग मगरीची शिकार झालेल्या रामू धोब्याची हकीकत मी
त्याला सांगितली, तर तो म्हणतो कसा :
"अहो, आज जमाना कुठल्या कुठं बदललाय्–
तुम्ही कुणाच्या भानगडीत पडू नका !
तुम्हीच गोत्यात याल !!"
त्याची ती अँग्लो–इंडियन पॉलिसी मला परवडण्यासारखी नव्हती.
म्हटलं :
"गोत्यात आलो तरी चालेल ! मदत कुठं मिळेल तेवढं सांगा–"
"धोबी नाही का ? म्हणजे त्याचा संबंध येतो दोन गोष्टींशी–
कापड आणि साबण . . . साबण आणि कापड . . . या
दोन्ही वस्तु व्यापार–खात्याच्या अखत्यारात येतात !

तुम्ही असं करा– व्यापार-मंत्र्यांना भेटा– मधल्या अधल्या
कारकुनाकडनं तुमचं काम होणार नाही !"
आता मी असा विचार केला :
मनसुखलालजींच्या बंगल्यावर जायचंय्
तिथं ती परमिटा-बिरमिटांची भानगड असते !
पुढच्या दाराशी रांग असायची–
आपण आपलं मागच्या दारानंच जावं–
पण पहातो तो काय !
तिथंच भली मोठी रांग ! ! !
मग चोर दरवाजानं आत घुसलो– मनसुखलालजी संत्रस्त
मुद्रेनं येरझारा घालीत होते.
'भारतात समाजवाद केव्हा येणार ?' ह्या काळजीनं त्यांची
झोप उडाली होती !
दोन्ही कान जोडून मी त्यांना नमस्कार केला,
तशी ते माझ्या अंगावर खेकसलेच :
"सूं छे ?"
"आपल्याला काय फार सर्दी वगैरे झालीय् काय ?"
"तुम्ही या दरवाजातनं आलांत, म्हणून मला वाटलं–तुम्ही
अहमदाबादहून आलात ! म्हणून मी गुजराथीत सुरुवात केली,
आता बोला–"
मी रामू धोब्याची हकिकत त्यांच्या कानावर घातली. ती ऐकून
विलक्षण कळवळ्यानं ते भाषण करू लागले– समोर श्रोता मी
एकटा :

"एक धोबी मेला आहे आणि त्याची वायको–मुलं उपाशी तळमळताहेत. अंत:करण कसं तिळतिळ, तिळतीळ तुटतं! –पण याबाबतीत आम्ही काय करणार? 'गरिबी हटाव' ही घोषणा आम्ही केव्हाच दिली आहे! आता यापुढचं सगळं कार्य खुद्द गरिबांनीच करायचंय्. आज रात्री झोपताना तुम्ही निश्चय करा– उद्यापासून मी गरीव रहाणार नाही! वस्स बघा काय चमत्कार होतो!"

"तुमचं भाषण मोठं सुरेख झालं, साहेव. पण–"

"हे पहा. मला वेळ नाही. तुम्ही असं करा– पंतप्रधानांची भेट घ्या–मोठमोठे प्रश्न निकालात काढण्यात त्या वाकबगार आहेत–"

पंतप्रधानांना भेटण्यासाठी सकाळी साडेसात–आठ वाजल्यापासूनच रांग लागते, हे ऐकून ठाउक होतं. म्हणून रात्रभर इकडे तिकडे हिंडून दुसऱ्या दिवशी सकाळी सहालाच मी त्यांच्या फाटकापाशी पोचलो . . . मला पहाताच संत्र्यानं दण्डा उगारला!

आपण जणु काही खूप घावरलो आहोत, असा आव आणून मी बंगल्याच्या आतमध्ये धूम ठोकली– ती थेट व्हरांड्याच्या पायरीपाशी! इतक्या लांववर पाठलाग करण्यात धोका आहे, हे ओळखून संत्र्यानं माळ्याला अव्वल विहारी थाटात साद घातली :

"का करत हो बन्सीधर?

गधा आवत है– वन्सीधर गधा!!"

हा वन्सीधर गधा कसा आहे हे पाहण्याकरता मी मान वर केली– कारण माझ्या तोंडात काही वासरी नव्हती–

तोंच स्वत: पंतप्रधान येताना दिसल्या.

दोन्ही कान जोडून अत्यंत आदरानं मी त्यांना अभिवादन करीत म्हटलं :

"पंधरा मिनिटं आपली मुलाखत मिळेल का ?"

"अवश्य ! याच्याहून मोठमोठ्या गाढवांना मी मुलाखती दिलेल्या आहेत ! कर सुरुवात–"

रामू धोब्याची हकीकत मी त्यांच्या कानावर घातली, तेव्हा त्या म्हणाल्या :

"फार वाईट झालं ! पण या बाबतीत सरकार या नात्यानं आम्ही काही करू शकत नाही...आता आपला आग्रहच असेल तर माझ्या पर्समधून मी आपल्याला शंभर रुपये देतो–"

हे ऐकल्यावर सामान्य माणसाच्या दु:खदैन्यावर मी त्यांना खूप सुनावलं...दमछाक झाली म्हणून थांबलो, तशी त्या हसून म्हणाल्या :

"तू मुलाखत घ्यायला आला आहेस की द्यायला ?"

मग मात्र मी गप्प झालो.

"नाही, नाही. तसं नाही. तू बोल. आयुष्यभर मी शिकत आले आहे– आज एका गाढवापासूनहि काही शिकेन म्हणते !"

एवढी परवानगी मिळाल्यावर मग काय !

'सूर्यापुढं काजवा' अशी साहित्यिक सुरुवात करून पार आरम पासून ॲटम बाँब पर्यंत अनेक विषयावरची माझी गाढवाची परखड मतं मी त्यांना ऐकवली !

भारताच्या पंतप्रधानांची मुलाखत मिळाली म्हणून मी खूष होतो; तर दिवसाची सुरुवात वेगळ्या प्रकारानं झाली म्हणून त्या खूष होत्या ! – रोज रोज तेच तेच चेहरे पाहून

कोण कंटाळणार नाही !

त्यांना अभिवादन करून मी निघालो, तेव्हा त्यांनी घाईघाईने

शंभराची एक नोट पर्समधून काढली आणि माझ्या कानात

कोंबीत त्या म्हणाल्या :

"ही त्या धोबिणीला अवश्य दे !"

पंतप्रधानांच्या निवास्थानातून बाहेर पडताच

'घेराव डालो'चा नारा न लावताच

वर्तमानपत्रांच्या बातमीदारांनी आणि छायाचित्रकारांनी मला

वेढलं; आणि माझी मुलाखत निवांतपणे घेता यावी म्हणून

ते मला घेऊन कॉन्स्टिटयूशन क्लबमधे गेले !!

देशी–विदेशी वार्ताहरांची तिथं एवढी प्रचंड गर्दी उसळली होती

की, मुंगीला पाय ठेवायला जागा नव्हती !

तास दीड–तास माझ्यावर अखंड, असंबद्ध प्रश्नाचा भडिमार करून

त्यांनी आपल्या ज्ञानात भर घातली.

आणि मग मुख्य संपादकापेक्षा मालकाला कोणता मथळा आवडेल

याचा विचार करीत लगालगा ते आपापल्या कचेऱ्यांकडे धावले.

रामू धोब्याच्या बायकोला ही शंभराची नोट देण्यापूर्वी यमुना

नदीत स्वच्छ आंघोळ करावी, म्हणून उठलो– तोंच :

पांढरं शुभ्र धोतर, पांढरा शुभ्र झब्बा–

तोंडावर परीटघडी हास्य–

डोक्यावर कोन साधून ठेवलेली टोपी आणि

तसलाच कोन साधून केलेली दोन हातांची हनुमान जुडी !

वाकवाकून ते माझ्या पातळीवर येऊ पहात होते :

"क्षमा करा !"

"केली !!"

"बोलणारे गाढव ते आपणच ?"

"हो ! आपल्याला सवय कुठाय् 'तो मी नव्हेच' म्हणून
अंग झटकाय्ची !"

"आज आपण गरिबाच्या झोपडीत पायधूळ झाडल्याशिवाय
पुढं जायचं नाही. अगदी जवळ आहे– बरजुटिया महल"

"अहो पण– मी फार दमलोय्–"

"मग आपली ब्यूक गाडी आहे ना– सॉरी, सॉरी–
तुमच्यासाठी स्पेशल शेव्रोलेट लॉरी बोलावतो लॉरी–"

मंडळी, आयुष्यात, पहिल्यांदा या शेवरोलेट लॉरीतनं सफर केली.
हा लोखंडी गाढव काय भिन्नाट पळतो म्हणून सांगू !
'बरजुटिया महल' मधल्या ज्या सोफ्यावर मला 'तशरीफ'
ठेवायला सांगण्यात आली, तो एवढा ऐसपैस होता की,
माझ्यासारखी चार भरलेली गाढवं तिथं आरामात बसली असती !

"काय घेणार ? लेमनस्क्वॅश् की–?"

या 'की' ला दिल्लीत फार मादक अर्थ आहे !
त्याच्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करून सर्वोदयी चेहरा ठेवीत म्हटलं :

"थोडासा घास खाईन म्हणतो– घास !"

लगेच चांदीच्या सुंदर 'ट्रे' मधे हिरवागार, सुगंधी घास आला
बारीक बारीक जुड्या कापून ठेवलेला !
कूलरमधलं थंडगार पाणी आलं–
मग बनारसी पान झाल्यावर शेटजींनी खुर्ची सोफ्याकडे सरकवीत
मला हळूच विचारलं :

"पंतप्रधानांशी मुख्य विषयावर आपलं बोलणं काय झालं ?"

"तुम्हाला मुख्य विषय कोणता हवाय् !"

"नाही म्हणजे–काँट्रॅक्टचा काही विषय–"
मी मनात म्हटलं– काँट्रॅक्टचा विषय निघाला होता–
सार्वजनिक क्षेत्रातली कंत्राटं देताना केवळ जावई-कंपन्यांचंच
उखळ पांढरं करू नये, या विषयावर आमचं तत्त्वत:
एकमत झालं होतं !
"हो–हो कंत्राटांचा विषय निघाला होता खरा–"
"अच्छा? मग केवढ्याचं काँट्रॅक्ट आहे? १० लाख? २० लाख?"
"छे छे– आमचा विषय त्याहून मोठा होता–"
"मग किती ? दहा कोटी– की, पंचवीस ?"
"ऐकून घ्या हो–"
"शू: ! अगदी बोलू नका– अहो, भिंतीला कान असतात ! हं,
चला फिफ्टी–फिफ्टी– करा सही"
अरे, म्हणजे कमाल आहे या शेटजींची !
कराराचे, भागीदारीचे सगळे कागदपत्र टाईप करून तयार
ठेवले होते यांनी !
म्हटलं : हीच चपळाई यानी हातातली कंत्राटं पुरी
करायच्या बाबतीत दाखवतील, तर आपला देश कितीतरी
प्रगति करील !
ते मला म्हणतात कसे :
"मी काही या एकाच काँट्रॅक्टमध्ये भागीदारी देत नाहीए–
आमच्या 'बरजुटिया ॲण्ड बरजुटिया सन्स प्रायव्हेट लिमिटेड'
मध्ये मी तुम्हाला भागी देतोय्–"
"कशाला कशाला ! मी तर एक साधा गाढव–"
"मग आमचे बहुतेक शेअर होल्डर्स आणखी कोण असतात ?"
" ? ? ? "

"आता आपण इथंच रहा–"
"छे छे– मला ही नोट त्या धोबिणीला–"
"कुठं रहाते ती ?"
"कृष्णनगर– यमुनापार"
"आत्ताच्या आता गाडी पाठवून तिला बोलावून घेतो. नाहीतरी मला एका धोब्याची गरज होतीच ! राहील विचारी इथंच कुठं तरी कम्पाऊंडमध्ये. शिवाय, माझा असा आग्रह नाही की, आताच्या आत्ता सही करा– आपण विचार करा– पण गरिबाला नाराज करून इथनं जाऊ नका–"
म्हटलं : त्या गरीब बिचाऱ्या विधवेला घर मिळेल, काम मिळेल– आपलं काय जातंय् रहायला ?
राहिलो !
दुसऱ्या दिवशी सकाळीच वर्तमानपत्रांचा भला मोठा गठ्ठा घेऊनच शेटजींनी माझ्या खोलीत प्रवेश केला.
जगातल्या यच्चयावत् सगळ्या वर्तमानपत्रांनी आमचा तो कालचा किस्सा छापला होता :
"बोलणाऱ्या गाढवाची पंतप्रधानांशी मुलाखत–"
"अजब चमत्कार ! "
पुण्याच्या सकाळनं :
"एक गाढव – पंतप्रधान – मुलाखत ! "
असा मथळा देऊन आपली Journalistic speciality कायम राखली होती !
त्याच पानावर एक मथळा होता :
"ग्रामपंचायत उपाध्यक्ष पत्नी कुऱ्हाड खून"
म्हटलं :

दोष त्यांचा नाही.

रोज सकाळी पदरमोड करून आपण हा मायभाषेचा खून विकत घेतो ना !

तिकडं मुंबईला आचार्य अत्र्यांनी 'मराठ्या'त
कोणत्या तरी गाढवाबरोबरचा आपला स्वत:चा पाच कॉलमी ब्लॉक पहिल्या पानावर ठसठशीत छापला होता–
आणि
त्याच्याखाली खुशाल छापलं होतं :
"हा बोलका गाढव मूळचा आमचाच शिष्योत्तम असल्याकारणानं पंतप्रधानांची मुलाखत घ्यायला जाण्यापूर्वी आमचा आशिर्वाद घेऊन गेला होता !"
मंडळी, आईशपथ सांगतो :
अजून आपण मुंबई पाहिलेली नाही !
First, foremost and fearless "Blitz" नं
हेडिंग दिलं होतं :
"In a typical Blitz-Style. A Donkey bumps on the Prime Minister !"
म्हणून कराकाच्या
"Current" नं हेडिंग दिलं होतं :
"Prime Minister bumps on the donkey !"
सत्य या दोघांच्या मधे कुठं तरी होतं– नेहमीसारखं !
रोज सकाळी सत्याच्या दुधात असत्याचं पाणी घालून
घरोघर घातला जाणारा हा रद्दीचा रतीव मी बाजूला सारला–
तर शेटजींनी तारांचं बंडल पुढं केलं :
हिमालयाचं कांचनगंगा शिखर चढणाऱ्या जर्मन पथकानं
विनंति केली होती :

"किमान १० हजार फुटांपर्यंत तरी आपण आमची सोबत करावी !
आपल्या पाठीवर आम्ही कोणताहि बोजा लादणार नाही."
दरसाल एक पडेल पिक्चर काढणारे आमचे मित्र
ख्वाजा अहमद अब्बास यांची पण तार आली होती :
"नया संसारच्या नया पिक्चर मधे
हीरोची भूमिका करायला होकार द्यावा !
तुम्हाला हिरॉइन कोण हवी ?
x x x x माला, की, माला x x?"
म्हटलं,
अब्बासमियाँ ही मंडळी आता बुढ्ढी झाली.
आम्हाला फिल्म इन्स्टिटयूटचा ताजा माल हवा !
सवंग लोकप्रियतेच्या या चलनी
पण कागदी डोलाऱ्याला मी काडी लावली
तेव्हा शेटजींनी त्यातली चिमूटभर राख भक्तिभावानं
कपाळाला लावली,
आणि ते मला म्हणाले :
बाहेर रांग लागलीय्— तुम्हाला भेटण्यासाठी "
"आज मी कुणालाहि भेटणार नाही— फार दमलोय् मी !"
"नाही, बाकीच्यांना घालवतो पण ते दिल्लीचे नगराध्यक्ष
आलेत—"
मी घाबरलो ! परवाचा तो आगीचा प्रसंग आठवला
"ते कशाला ?"
"दिल्ली महापालिकेतर्फे आपला सत्कार करावा
आपल्याला मानपत्र द्यावं—"
"मला ? आणि ते कशाबद्दल ?"

"सभा तहकूब करायला, मानपत्र द्यायला महापालिकेला कधी काही कारण लागतं का ? त्यातून आपण आता विश्वविख्यात झालात– मी तर तुमच्या वतीनं होकारदेखील कळवलाय् त्यांना ! सगळीकडे मोठमोठे पोस्टर लागले असतील– बड्या अंमलदारांना आमंत्रणं गेली असतील–"

मी गप्प बसलो.

एका दारानं शेटजी बाहेर पडले

आणि

दुसऱ्या दारानं तरुण मुलींचा घोळका आत घुसला !

रांग मोडून जनानी वशिल्यानं आत घुसलेल्या या घोडनवऱ्यांना

म्हणे माझी स्वाक्षरी हवी होती– स्वाक्षरी !

त्यांच्या हातातल्या नक्षीदार वह्या मी न्याहाळल्या –

दिलीप, राज, वैजयंती, मीनाकुमारी–

अशा सगळ्या सह्या होत्या !

म्हणजे

ह्यांना त्यांच्यात आणि माझ्यात काहीच फरक दिसत नाही तर !

इतक्यात,

शेटजी एका रुपसंपन्न तरुणीला घेऊन माझ्याकडे आले,

आणि म्हणाले :

"ही माझी कन्या रुपवती !

हिला स्वाक्षरीबरोबर काही संदेश पण द्या

ती जरा लाजते आहे."

मनात म्हटलं :

शेटजी, आज जमाना कुठल्या कुठं पालटलाय्

आणखी पाचदहा मिनिटं तुम्ही इथं थांबलात,

तर शेवटी तुम्हीच लाजाल !
पण शेटजींना सत्काराची कामं असल्यानं ते लगबगीनं निघून गेले...
ते गेल्याची खात्री होताच,
त्या लाजाळूच्या झाडानं विलक्षण लडिवाळपणानं
आपला कोमल हात माझ्या पाठीवरनं फिरवला,
आणि
अतिशय लाडिक सुरात ती मला म्हणाली :
"द्या ना गडे."
म्हटलं : "घ्या ना गडे !"
बस, बस, बस !
तो गोड निःश्वास, ती गहिरी नजर . . .
मला तर वाटलं :
आपण एकाद्या हिमधवल संगमरवरी गुहेत बसून हिरवागार घास खातो आहोत !
स्वच्छ सूर्यप्रकाशानं वृक्षराजीमधून पसरलेल्या उबदार दुलईवर निवांत पहुडलो आहोत ! !
आणि
ढगांचे पांढरे पांढरे पुंजके आकाशात मदनमस्त लोळण–फुगडी खेळण्याचं अवाहन करताहेत ! ! !
मंडळी,
आता तुम्हीच सांगा :
मन एवढं प्रसन्न असल्यानंतर
काय फक्त स्वाक्षरीच द्यायची असते ?
अरे, आपण तर बुवा काय वाट्टेल ते द्यायला चारी पायावर

तयार होतो !
पण
किमान आनंद व्यक्त करावा
म्हणून
डोळे मिटून शुद्ध पंचम लावला !
डोळे उघडून पाह्यलं :
तर त्या नक्षीदार वह्या फरशीवरती मदनमस्त लोळणफुगडी खेळत होत्या,
आणि
त्यांच्या वळणदार मालकिणींनी केव्हाच पोबारा केला होता !
काय विचित्र आहे हा माणूस
दुसऱ्याच्या प्रसन्नतेतलं संगीत
ऐकूच येत नाही या आत्मनिष्ठ प्राण्याला !

— मध्यंतर —

# उत्तरार्ध

मंडळी,
दिल्ली महापालिकेतर्फे आमची जी भव्य मिरवणूक निघाली होती,
तिचा थाट काय सांगू तुम्हाला !
अहो, अक्षरशः लाखो लोक जमले होते–
बोलणारा गाढव पहायला !
बायकांना तर वाटलं :
हा काहीतरी दैवी चमत्कारच आहे !
परिणाम असा झाला की,
जेव्हा चांदणी चौकातून आमची मिरवणूक निघाली,
तेव्हा माता–भगिनींनी अस्मादिकांवर
अभूतपूर्व पुष्पवृष्टी केली पुष्पवृष्टी ! !
बरं–
पाण्यावरणं चालतो म्हणणाऱ्या त्या हठयोग्यासारख–
हा सगळाच प्रकार बोगस नाहीए,
अशी लोकांची खात्री पटावी म्हणून
आशीर्वादादाखल, धन्यवादादाखल ,
चौकाचौकात चार–चार शब्द मला बोलावेच लागले !
मी नुसतं तोंड उघडलं,
की काहीजण धाडकन् मूर्च्छित पडत !
तर काहीजण साष्टांग दण्डवत घालीत !
सबंध राजधानीवर विलक्षण धार्मिक छाया पसरली होती–
–जनसंघाला तर वाटलं :
आपल्याच स्वच्छ कारकिर्दीचा हा परिणाम आहे !–
पण

धाडकन् मूर्च्छित पडणारांना पाच–पाच रुपये,
आणि नुसताच दण्डवत घालणारांना दोन दोन रुपये
शेठ वरजुटियांनी पहाटेच वाटल्याचं मागाहून मला कळलं.
तेव्हा मीच मूर्च्छित पडायच्या बेतात होतो ! ! !
टॉऊन हॉल मध्ये पोचताच,
मोठमोठ्या मंडळींशी माझा परिचय करून देण्यात आला,
मग अध्यक्ष भाषण करायला उठले–
एकेक शब्द ते जपून, आठवून बोलत होते !
कारण
गाढवाला कोणती विशेषणं लावायची ! !
"ह्यांची लोकप्रियता,
यांची शांतता प्रियता . . .
यांची मानवता–"
मनात म्हटलं : बरोबर आहे !
नाहीतरी आता माणसाजवळ मानवता राहिली आहेच कुठं !
"–वगैरे वगैरे सद्गुणांबद्दल
दिल्लीच्या नागरिकांची ही विराट सभा
त्यांना दिल्लीचं सन्माननीय नागरिकत्व बहाल करीत आहे !"
टाळ्यांचा कडकडाट . . .
नंतर, अखिल भारतीय पशुहत्या–बंदी समितीतर्फे एक
आणि रेसच्या घोड्यांची देखभाल करणाऱ्या नोकर संघातर्फे एक
–अशी दोन मानपत्रं मला अर्पण करण्यात आली !
त्या दोन्हींची भाषा इतकी सही सही सारखी होती–
–दोन्ही बहुधा एकाच पत्रकारानं लिहून दिली असावीत !–
की, मी पुढं पुढं लाजून मान खाली घालायचं सोडून दिलं.

मग उत्तरादाखल बोलण्याची मला विनंति करण्यात आली;
तेव्हा मी म्हणालो :
"तुम्ही मानव–समाजानं आम्हा गाढव–समाजाचं सामूहिक
मोठेपण मागेच मान्य केलं आहे . . . कारण तुम्ही रचलेल्या
म्हणींचे वानगीदाखल हे दाखले पहा :
'अडला हरी–गाढवाचे पायधरी !'
म्हणजे प्रत्यक्ष विश्वाचा विधाता हरी कुण्या कुत्र्या–मांजरांचे
किंवा गायी–म्हशींचे पाय धरीत नाही–
आमचे पाय धरतो !
'गाढवा पुढे वाचली गीता–'
म्हणजे बघा–फडक्यांची कादंबरी किंवा अर्नाळकराची
रहस्यकथा नव्हे, तर प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनी
अर्जुन नावाच्या एका कचखाऊ माणसाला सांगितलेली गीता !
किंवा
'गाढवाला गोपाळ शेठ–'
म्हणजे पहा–गोपाळ–क्लार्क, किंवा गोपाळ–प्यून नव्हे
तर गोपाळ शेठ !
सारांश,
आमचं सामूहिक मोठेपण तुम्ही मागेच मान्य केलं आहे !
आता मी गाढव असून माणसासारखं बोलतो
म्हणून आज हा जो तुम्ही माझा वैयक्तिक सन्मान केलात,
हे तर ठीकच झालं !
पण
आता आमच्या समाजातर्फे मी आपल्याला जाहीर आश्वासन देतो
की माणूस असून गाढवासारखं बोलणाऱ्यांचाहि

आम्ही लौकरच इथं जाहीर सत्कार करणार आहोत !
आता माझ्यापुढं एकच छोटीशी अडचण आहे
की त्या सत्कार–समारंभाला व्यासपीठ केवढं मोठं लागेल,
याचा मला अजून अंदाज येत नाही . . ."
इथं वरजुटिया शेटजींनी माझं शेपूट ओढलं.
तेव्हा या माणूस नावाच्या बेट्याला
चांगले चार शब्द सुनवून द्यावेत असं वाटलं होतं . . .
पण मन आवरलं.
संध्याकाळी त्यांच्या बंगल्यावर मोठी मेजवानी होती–
माझ्या सन्मानार्थ !
मोठी म्हणजे, माणसं खूप अशा अर्थानं नव्हे.
जेमतेम शे–पन्नास माणसं !
पण ज्यांच्या मोठ मोठ्या गाड्या आहेत,
आलिशान बंगले आहेत–
अशी !
मेजवानी सुरु झाल्यावरोबर
करोडोपति भाटियांचा सेक्रेटरी
माझ्या कानाशी लागला :
"आमच्या शेटजींना
तुम्हाला अगदी एकट्याला भेटायचंय् !"
त्याच्याशी मी काही बोलायच्या आतच
बरजुटिया शेटजींनी मला दुसऱ्या घोळक्यात खेचलं . . .
मग तोच तो परिचय,
शेंडाबुडुख नसलेल्या त्याच त्या गप्पा,
गैरहजर असलेल्यांची टिंगल टवाळी.

तेच ते खवट–कुजट हसणं–
उच्चभ्रू श्रीमंतांची संस्कृति !!
इतक्यात, माजी संस्थानिकासारखा दिसणारा एक गुलछबू
माझ्या कानाशी लागला :
"लालाजींना फार इंटरेस्ट आहे,"
त्या पंचवीस कोटींच्या स्कीममधे–'
लाला रामदयाल यांचा हा मुनीम !
तेवढ्यात रुपवतीनं धावत येऊन मला खूष खबर दिली :
"विलींग्डन क्लबच्या अध्यक्षा लेडी सारेगामा गाओ–"
"काय गाओ ?"
"सारेगामा–"
"हे तर आमच्या संगीतातलं अर्ध–सप्तक !"
"नाही, नाही–ते त्यांचं संपूर्ण नाव आहे–"
"असू द्या, असू द्या–"
"तर या लेडी सारेगामा गाओ तुम्हाला भेटायला उत्सुक आहेत–"
"मीहि त्यांना भेटायला उत्सुक आहे–"
आम्ही निघालो, तर मधेच
पाच सहा नवश्रीमंत महिलांनी आम्हाला घेरलं :
"आमची पण ओळख करून देना आजच्या हीरोशी–"
या नवश्रीमंत महिला–
म्हणजे वडया बडया शेठ–सौदागाराची
कुणी दुसरी, कुणी तिसरी, तर कुणी चौथी वायको !
खरं तर, ज्यांनी एकेका साडीवर संसार केला,
पै–पै सांभाळून ठेवली,
सात सात, आठ आठ मुलांना जन्म दिला–

त्या त्यांच्या पहिल्या वायका–आज गावंढळ म्हणून परित्यक्ता
–कारण,
त्यांच्यापाशी चेहऱ्याची सुंदरता नाही,
बॉलरूमची नग्नता नाही,
कामचलाऊ फर्ड इंग्रजी नाही !!!
बरं,
या नव्या वायकांच्या डोक्याचे कप्पे आपण तपासू गेलो;
तर एका कप्प्यात शे–पन्नास साड्या,
एकात शे–पन्नास इंग्रजी शब्द,
आणि एकात माकड–मैना, पोपट–कुत्रा असल्या पाळीव
प्राण्यांची गर्दी !
मुलांचा कप्पा वहुधा रिकामाच असेल ...
यांच्यातल्या कुणाला
"सीमेंट गर्ल"
"आयर्न गर्ल"
असली टोपणनावं आहेत !
कारण, त्यांनी आपापल्या नवऱ्याला सीमेंटचं किंवा
लोखंडाचं परमिट मिळवून दिलंय् ना !!
कसं दिलं–देवाला डोळे !!!
त्यांच्यातली कमला–चेहरा विशेष आकर्षक !
इतका घडीव चेहरा परमेश्वरानं वनवला नसावा–
हा वहुधा फोर्ड मोटर कंपनीत तयार झाला असावा !
लाडे लाडे ती मला म्हणते कशी :
"Oh you poor donkey darling !
I have almost begun to love you !!'

म्हटलं : "मेलो !"
रुपवतीनं माझी सुटका केली.
लेडी सारेगामा गाओ—
म्हणजे असल्याच नवश्रीमंत महिलांची स्वयंभू पुढारी !
या अगडबंब प्राण्याला घडवताना
परमेश्वराची मनःस्थिती बहूधा द्विधा झाली असावी द्विधा !
स्त्री घडवायची की पुरुष ?
प्रत्यक्ष विधात्याच्या द्विधा मनःस्थितीची ती साक्षात् मूर्ति
माझ्यासमोर उभी होती . . .
"काय नवजवान !"
असं म्हणून त्यांनी माझ्या पाठीवर एवढ्या जोरात दणका दिला
की दोनचार तरी बरगड्या मोडल्या असाव्यात !
सातमजली गडगडाट करून हसणं—
पुरुषी थाटाचे हातवारे करून बोलणं—
मग यजमानांशी परिचय :
"Meet सर सारेगामा—"
मी पहात राहिलो—
ही बाई जितकी अगडबंब,
तितका तो माणूस लुकडा !
ही जितकी मोठ मोठ्यांदा बोलायची,
तितका तो तोंडातल्या तोंडात पुटपुटायचा !
आतल्या आत वळवळायचा—गोगलगायीसारखा !!
म्हटलं,
या इसमानं आपल्या शरिरातली सगळी हाडं गोळा करून
एकाद्या बँकेच्या लॉकरमधे सुरक्षित ठेवली असली पाहिजेत, सुरक्षित!

पत्नीच्या हस्तक्षेपाचा केवढा हा धाक !
मी त्यांच्याकडे निरखून पहातोय्
हे ध्यानात येताच बाई मला म्हणतात कशा :
"त्यांच्याकडे असं निरखून पाहू नका–
नाहीतर पटकन् त्यांचं हार्टफेल होईल ना, हार्टफेल !"
–आणि मग पुन्हा एकदा तो पुरुषी थाटाचा
सातमजली गडगडाट
आणि
मुद्दाम पाडलेला पदर–
बाकी ज्यांच्याजवळ दाखवण्यासारखं काही नसतं,
त्यांनाच प्रदर्शनाची भारी हौस असते, नाही ?–
–न सावरता, बाई म्हणाल्या :
"उद्या आमच्या विलिंग्डन क्लब मध्ये
स्त्री–सौंदर्य स्पर्धा आहे,
भारत–सुंदरीची निवड आम्ही करणार आहोत–
तिथं आपण परीक्षक म्हणून–"
"अहो, काय बोलताय् काय ?
स्त्रीसौंदर्य स्पर्धेत ? मी–परीक्षक ?"
"हूं ! म्हणजे काय झालं–
आम्हाला हवाय् नि:पक्षपाती परीक्षक–
दिल्लीतली खूप मोठ मोठी नावं आम्ही डोळ्यापुढं आणली,
काही केंद्रीय मंत्र्यांची देखील नावं त्यात होती !
पण आमच्या बातमीदारांनी आम्हाला सांगितलं
की प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या तरी सुंदरीत
इंटरेस्ट आहेच !"

"हो–हो–त्या अर्थानं मी अगदी निःपक्षपाती आहे–
मला तुम्हा कुणातहि इंटरेस्ट नाही !
शिवाय,
रोमन साम्राज्याच्या काळात
सुंदर स्त्रिया गाढविणींच्या दुधानं आंघोळ करीत असत–
तेवढ्या अधिकारावर
मला परीक्षक व्हायला काहीच हरकत नाही !
अलिकडं
सुखवस्तु बायकांनी कुत्री–मांजरं पाळायला सुरुवात केलीय्,
म्हणून तर हा लिपस्टिक–पावडरींचा
आणि ॲडिशनल पॅडिंगचा
कुरूप जमाना आलाय् !"
"हो, पण स्त्री–सौंदर्याचे विविध नमुने पहाताना
त्यांची तुलना मात्र गाढविणीशी करू नका हो–"
"कळतंच, अहो–द्विपाद सौंदर्य
आणि चतुस्पाद सौंदर्य
यातलं व्यस्त प्रमाण काय आम्हाला कळत नाही की काय !"
"बरं, मग ठरलं–उद्या संध्याकाळी–"
"–सहा वाजता ! विलिंग्डन क्लब मधे !"
बाईनी हात हलवून
"टा ऽ ऽ टा" केलं !
तेव्हा मी कान हलवून "बा ऽ ऽ टा" केलं !!
नाहीतरी आपलं हल्लीचं जीवन
खाली बाटा आणि वर टाटा
यांच्यामधे भरडलं जातंच आहे की !

मन इतकं प्रसन्न होतं–
वाटलं :
वाहेर वागेत जाऊन गडवडा लोळावं
आणि वागेश्रीची एक झकास तान सोडून द्यावी !
म्हणून वाहेर आलो.
पहातो तों :
घाणेरड्या कपड्यातला एक माणूस
दोन गाढवांच्या दोऱ्या धरून अंधारात उभा–
"शेटजी, हा कोण ?"
"अरे हो–पार्टीच्या गडबडीत विसरलोच तुम्हाला सांगायला–
हा इसम म्हणतोय् की
मी तुमचा वाराबंकीचा मालक आहे–"
लगेच पुढं होऊन
तो ढब्बू कुंभार छाती पिटून ओरडू लागला :
"अरे धवडू, चल घरी !
हे वघ, तुझे आईबाप आलेत तुला न्यायला–"
'आईबाप' म्हटल्यावरोवर शेटजी भडकलेच
"ही गाढवं यांचे आईवाप ?
अरे, कुठं आमचा हा अस्सल विलायती डाँकी–
–एवढा अस्सल विलायती डाँकी तुला फक्त
लॉर्ड मौंटबॅटनच्याच तबेल्यात आढळेल !
आणि कुठे तुझी ही गलिच्छ, गावंढळ गाढवं !"
शेटजींना सोडून तो कुंभार माझ्या पाया पडू लागला :
"केवढ्या आशेनं आलो आम्ही !
अरे, कर्ज काढून आलो–

आता परत जायला देखील पैसा नाही–"
"शेटजी, याला परतीसाठी पैसें देऊन टाका !"
शेटजींनी त्याच्या अंगावर शंभराची एक नोट फेकली
आणि त्याला सज्जड दम भरला.
"पुन्हा इथं पाऊल ठेवशील, तर याद राख !"
त्याच्या ध्यानात आलं–
एकदा कुणी श्रीमंतांच्या नादी लागला–
की पुन्हा गरिबांत कधीच येणार नाही तो !
तो निघून गेला.
पण मी खिन्न होतो.
माझी समजूत काढण्यासाठी शेटजी बोलत होते.
"जरा कुठं कुणी थोडी उन्नती करून घेतली
की लगेच चारी बाजूंनी त्याचे सगेसोयरे गोळा होतात
जगाची रीतच आहे ती !!"
पण
मनातनं मी फार दुःखी होतो.
म्हटलं :
उगाच घालवून दिलं आईवडिलांना ...
माझ्या पाठीवरनं मोठ्या मायेनं हात फिरवीत
शेटजी मला म्हणतात कसे :
"आता आईवडलांचं राहू द्या–
पण
आता तुमचं असं वय झालंय्,
तुम्हाला आता खरं म्हणजे अशा व्यक्तीची गरज आहे
की जी तुमच्यावर प्रेम करील,

तुमची देखभाल करील,
तुमचा जीवनसाथी बनून राहील !"
"तुम्ही काय म्हणताय्, ते मला कळतंय्–
पण आता माझ्याशी कोण लग्न करणार ?"
"आपली काही हरकत नसेल,
तर आपण
माझ्या मुलीशी,
रुपवतीशी कां नाही लग्न करीत ?"
"कुणाशी ? रुपवतीशी ?"
"हो !"
"अहो, हा तिच्या जीवन–मरणाचा प्रश्न आहे–
तुम्ही तिची संमति घेतलीत का ?"
"हो–वाटलं तर, खात्री करुन घ्या तुम्ही–"
शेटजींनी घंटी वाजवून मुलीला बोलावून घेतलं,
आणि
एकाद्या चतुर सासऱ्यासारखे
ते दिवाणखान्यातनं हळूच सटकले !
आता तिथं मी आणि रूपवती
आम्ही दोघंच उरलो.
ती दुपट्टा सावरीत होती,
पायानं उकरायला जमीन नसल्याकारणानं
हाताची नखं कुरतडीत होती–
आणि मी–
मी आमच्या या भावी नववधूचं आपादमस्तक
निरीक्षण करीत होतो !
मी हळूच विचारलं :

"काय– ही गोष्ट खरी आहे ?"
"कोणती ?"
या प्रेमाच्या बाबतीत, आपण जणु काही
त्या गावच्याच नाहीत,
असं दाखवण्यात बायका–मुळी मोठ्या पटाईट असतात,
नाही ?
"हेच की–तुम्ही माझ्याशी
लग्न करायला तयार आहात ?"
"हो !"
होकार ऐकून माझा तर आनंद
पोटात मावेना !
वाटलं :
चांगल्या चार दोन लाथा झाडून द्याव्यात !!
पण मन आवरलं.
म्हटलं :
सभ्यता आणि संस्कृति यांना ते शोभून दिसणार नाही !
"अहो पण, तुम्ही नीट विचार केलात का ?
नाहीतर,
सगळ झालं– गेल्यावर
मागाहून पश्चात्ताप व्हायचा !
कारण मी पडलो हा असा गाढव–"
"तसं नाही काही–
वहुतेक बायकांना किनई
असाच नवरा हवा असतो !"
"तुम्हा बायकांचं एकवेळ ठीक आहे,

पण बाहेरच्या जगात लोक काय म्हणतील–
शेट वरजुटिया– आणि
त्यांचा जावई एक गाढव ?"
"मग त्यात काय झालं ?
बहुतेक वड्या वड्या लोकांचे जावई आणखी कोण असतात ?"
नव्या समाजाचे नवे नियम समजावून घेत होतो.
ती बोलतच होती :
"आणि आपला विवाह तसा गुप्तच राहणार !"
"गुप्त ?"
"हो ! लग्न झाल्यावर सुद्धा तुम्ही तुमच्या तबेल्यात–
आणि मी माझ्या खोलीत–
मधून मधून तुम्ही माझ्याशी टेलिफोनवर बोलायचं–"
मनात म्हटलं :
लग्नानंतरची सगळी महत्त्वाची कामं
ही बया माझ्याकडून
टेलिफोन वरून करून घेणार की काय ?
"मात्र तुमचं ते चेकबुक, माझ्याकडे राहील–
ते पंचवीस कोटींचं खातं माझ्या नावावर राहील–
हो किनई गडे ऽऽऽ"
प्रीतीच्या स्वर्गीय भावनेचा
मानवानं इहलोकी पुकारलेला लिलाव
ऐकून ठाऊक होता–
पण तो एवढ्या थराला गेला असेल,
याची मला कल्पना नव्हती !
निरोप घेताना

रूपवतीनं हळूच माझ्या कानांचं चुंबन घेतलं–
त्यावेळी तिच्या चेहऱ्यावर
कोणते भाव उमटले होते,
परमेश्वराला ठाऊक–
पण माझ्या डोळ्यात मात्र पाणी आलं !
जिन्याच्या शेवटच्या पायरीवरनं
तिनं आणखी एक
'हवाई चुंबन'
माझ्या रोखानं फेकलं–सफाईदारपणे !–
मी पण अलगद ते झेललं !
पण ओठापर्यंत काही नेववेना–
म्हटल :
ह्या चुंबनाचा आनंद मानू
की त्या सफाईदारपणाचा विषाद मानू
अशा द्विधा मन:स्थितीतच
मी ते तिथंच झटकून
माझ्या तबेल्याकडे वळलो !
दुसऱ्या दिवशी संध्याकाळी
तो 'विलिंग्डन क्लब' मधला हॉल
कसा नव्या नवरी सारखा नटला होता !
तिथं सिमल्याची राणी होती, उटकमंडची राणी होती,
दार्जिलिंगची राणी होती–
दिल्लीची राणी कमला,
आणि नव्या दिल्लीची राणी–रुपवती !
सगळ्या राण्यांशी माझा परिचय करून देण्यात आला.

आणि मग हुकूम झाला :
"चला, कपडे काढा—
—आणि पोहोण्याचा पोषाख घालून तलावावर चला !"
ह्या राण्या नव्या पोषाखात येताच
पाश्चात्य छायाचित्रकारांची मोठीच धांदल उडाली . . .
मी बाईंना म्हटलं :
"बाईसाहेब, मी जर आपल्याला
लेडी गामा—"
कारण, मंडळी—
त्या गामाला लेडी होती की नाही
ठाऊक नाही.
पण ही लेडी मात्र गामा होती गामा !
—"लेडी गामा या छोटयाशा नावानं
हाक मारली, तर आपली काही हरकत नाही ना ?"
"नाही !"
वजन यंत्राजवळ उभ्या असलेल्या
एका म्हाताऱ्याशी बाई माझी ओळख करून द्यायला लागल्या
"हे मिस्टर भजनानी
आता यांचं एवढं वय झालंय्—
पण अजून यांनी लग्न केलेलं नाही !"
"यांनी अजून लग्न केलेलं नाही ?
मग यांना बायकांच्या वजनातलं काय कळणार ?"
"हा आम्हा विवाहितांचा वृथा अहंकार असतो—
खरं तर, अशाच मंडळींचं ज्ञान
अधिक व्यापक, अधिक सखोल

असण्याचा संभव असतो !!
कारण पहा ना–ह्यांनी हे जे यंत्र तयार केलय्,
त्यावर स्त्रीचं संपूर्ण वजन तर मिळतंच,
पण शिवाय पावलापासून धडापर्यंतचं धडापासून मानेपर्यंतचं
आणि मानेपासून डोक्यापर्यंतचं
असं वेगवेगळं वजन देखील मिळतं !!!"
–"आणि डोक्यातल्या अकलेचं–
हो बाकी, त्याचा इथं काही संबंध नसणार म्हणा !"
जरा पुढं गेलो तर खुर्ची समोर तिवई अशी ठेवली होती
की मला कळेना आपण आलो कुठं !
"हे मिस्टर दारुवाला–"
"हे काय, इथले बाटाचे प्रतिनिधी आहेत वाटतं ?"
"अं हं ! हे मुलींच्या पावलांची ठेवण आणि गोलाई मोजतात–"
"गोलाई ? कशाची ?" "टाचांची !" "हां–मग हरकत नाही !"
बाकी, असल्या पोरींचे पाय पाळण्यात पाहूनच
बहुतेकांच्या आईबापांनी तिकडे हाय खाल्ली असेल !
थोडं पुढं गेलो– तर एक राणी तांडव–नृत्याची पोझ् घेऊन–
आपल्या मांडीचं आणि पोटरीचं माप देत होती म्हटलं :
"ह्या शिप्याचं इथं काय काम आहे ?"
"हे शिपी नाहीत ! स्त्रियांच्या मांड्या आणि पोटऱ्यांचे तज्ज्ञ !
श्रीमान् खटखट खंडलिया –
अहो, वेरूळला जेवढ्या म्हणून स्त्रीमूर्ती आहेत ना,
त्या सगळ्यांच्या मांड्यांची आणि पोटऱ्यांची मापं
यांना तोंडपाठ आहेत तोंडपाठ !"
म्हटलं :

"लग्नाच्या बायकोचं नावदेखील सांगता येणार नाही, बहुतेक !"
चार पावलांवर प्रोफेसर बांके बिहारी 'आह' बनारसी,
आणि जनाब हमीद हसन 'वाह' लखनवी–
"आह" हे नितंब तज्ज्ञ,
तर "वाह" हे कमर तज्ज्ञ !
'ती नितंबिनी तंबीच देइल तुजला'
ह्या धमकीनं घाबरून जाऊन
उंच डोलकाठीसारख्या दिसणाऱ्या या माणसानं
आपल्या विषयाचा फक्त पुस्तकी अभ्यास केला असावा,
हे मी ताडलं,
म्हणून त्याला सोडून मी कमर तज्ज्ञाकडे वळलो :
"वाह साहेब–"
"हां साहेब !"
"मी मूळचा लखनौचा आहे, म्हणून विचारतो :
लखनौची सौंदर्यराणी आहे–
तिला तर म्हणे कंबरच नाही,
मग तुम्ही काय तपासणार ? "
त्यांनी नाबडतोब खिशातून सूक्ष्मदर्शक यंत्र काढलं
आणि मला दाखवीत ते म्हणाले :
"म्हणून तर हे सतत जवळ बाळगीत असतो !"
अशा रीतीनं ओठ, केस, गाल– असे सगळे अवयव
सुटे सुटे करुन मांडून ठेवले होते !
मला तर वाटलं :
आपण एकाद्या कारखान्यातच येऊन पडलो आहोत !
जिथं जसे पट्ट्यावर सुटे सुटे भाग एकत्र जोडतात !

त्या तथाकथित अवयव–तज्ज्ञांचे निर्णय माझ्या हातात होते
आणि माझा अंतिम निर्णय ऐकायला सभा उत्सुक होती.
थोड्याशा चढ्या आवाजातच मी सुरुवात केली :
"स्त्री–सौंदर्याचं मोजमाप करायची
ही काय माणुसकीची पद्धत झाली ?
माता, भगिनी, पत्नी अशा विभिन्न नात्यानं
स्त्रीची पवित्र मूर्ति आमच्यासमोर उभी असते.
छत्रपती शिवाजी महाराजांच्या अंगात
स्वतंत्रतेची सळसळ निर्माण करणारी
जिजामाता–
भगवान् श्रीकृष्णासाठी अंगावरचं भरजरी वस्त्र फाडून देणारी
भगिनी द्रौपदी–
प्रभू रामचंद्रांच्या मागोमाग चौदा वर्षं वनवास भोगणारी
सीतामाई–
हे आमचे आदर्श !
आणि तुम्ही इथं काय
त्या पावित्र्य मूर्तीच्या सुटचा सुटचा अवयवांचा बाजार मांडलाय् !
अरे, स्त्रीच्या उरोजांचा उभार तुम्ही मोजाल,
पण–
त्यामागच्या अंतःकरणातल्या ममतेची खोली कुणी मोजायची ?
आमचा रामू धोबी रोज दमून भागून घरी आल्यावर
त्याची बायको हसून त्याचं स्वागत करायची !
दिवसभराच्या काबाडकष्टाचं परिमार्जन करणाऱ्या
त्या एका स्मितहास्यावरनं तुमचं हे इथलं सगळं बेगडी, बाजारी सौंदर्य
ओवाळून, फेकून द्यावं असं वाटतं !!!"

हा एवढा मोठा सत्य पण कडू डोस
त्या श्रीमंत, उच्चभ्रू मंडळींनी कसा पचवला,
परमेश्वराला ठाऊक !
पण त्यांचे ते हिंस्र चेहरे मला दिसू लागले.
म्हटलं :
आपल्या अंगावर आता एकादी खुर्ची,
छत्री, नाहीतर पर्स देखील आल्याशिवाय रहायची नाही !
Offensive is the best defensive
असा विचार करुन चारी लाथा सपाटून झाडल्या
श्रोतृवृंदात उडी घेतली आणि धूम पळत सुटलो.....
'इण्डिया गेट'च्या पुढं आलो
एका बगिच्यात मोठी पार्टी चालली होती, तिच्यात घुसलो
तों चक्क लेखकासारख्या दिसणाऱ्या,
पुस्तकी चेहऱ्याच्या माणसानं माझं स्वागत केलं
ते हातात दण्डा घेऊनच ! पण त्याचा एकूण आव
ती सोवळ्यातली बाई हातातल्या लाटण्यानं
कावळा हाकलायचा प्रयत्न करते
त्या थाटाचा होता !
"अहिंसेवर श्रद्धा आहे म्हणून रे,
नाहीतर केव्हाच हा दण्डा तुझ्या पाठीत घालून
मोकळा झालो असतो !"
"हिंसा करा, अहिंसा करा– काय वाट्टेल ते करा,
आता मी पुन्हा तिथं परत जाणार नाही !"
मी बोलतोय् हे पाहाताच
त्याच्या हातातला दण्डा गळून पडला.

"त-त-तू आहेस तरी कोण ?"
म्हटलं :
"बनाकर गधों का हम भेंस गालिब
तमाशा-ए-अहले-करम देखते हैं।"
बस्स! एवढा शेर ऐकल्याबरोबर-
आपल्या साहित्यिक दोस्तांकडे वळून तो म्हणतो कसा :
"अरे यार, कमाल आहे- चचा गालिब
गाढवाच्या रुपानं आपल्याला भेटायला आलेत !"
सगळ्यांनी मोठ्या मानसन्मानानं मला आपल्यात बसवून घेतलं.
पण बोलायला कुणीच तयार नाही.
तेव्हा मीच विचारलं :
"आज ही कसली मैफल जमवलीत ?"
"साहित्य ॲकॅडमी, संगीत नाटक ॲकॅडमी
आणि कला केंद्र यांची ही संयुक्त बैठक आहे !"
" असं का ? छान, छान !"
"इथं पहाना- कसे थोर थोर लेखक- कलाकार जमले आहेत.
आता हे- हे श्री. गणेंद्रनाथ नागपाल-
हिंदीतले सर्वश्रेष्ठ कादंबरीकार.
ह्यांचं वैशिष्टय तुम्हाला माहित नसेल ?"
"नाही !"
"आपल्या एका कादंबरीत जे तत्त्व ते मांडतात,
त्याचं संपूर्ण खंडन ते आपल्या दुसऱ्या कादंबरीत करतात !-
आणि आता म्हातारपणी कुठल्याहि गोष्टीचं मंडन करण्याच्या
भानगडीत न पडता,
ते फक्त मुंडन करीत असतात !"

"छान आहे !
पण काय हो– मला अगदी बालपणापासून
लिहिण्या–वाचण्याचा नाद आहे,
मला तुमच्या ॲकॅडमीचं सभासद होता येईल का ?"
"भलतंच ! अहो किमान पन्नास वर्षं पुरी झाल्याखेरीज
लेखक **'साहित्यिक'** झाला असं आम्ही मानीत नाही !
आता इथंच पहा ना–
कसे एकाहून एक थकलेले लेखक जमलेत !
अहो आमच्या कार्यकारिणीत नव्या, नव्या पुस्तकांच्या ऐवजी
जुन्या, जुन्या रोगांवरच जास्त चर्चा होते !!
एका थोर मराठी कादंबरीकाराला फुरसं चावलं
आणि पाचव्या मिनिटाला ते फुरसं मेलं–
हा 'ललित'– कठोर किस्सा आमच्या कार्यकारिणीत आता
सर्वांना तोंडपाठ झालाय् . . .
तुम्हाला जर अशाच एकाद्या दुर्धर रोगानं पछाडलं असेल तर–"
"नाही, नाही ! माझी प्रकृति अगदी ठणठणीत आहे !
बरं, काय हो–
साहित्याच्या अभिवृद्धीसाठी सध्या ॲकॅडमी काय करतेय् ?"
"आम्ही सध्या एक सूची तयार करतोय्–
गेल्या शंभर वर्षांत लिहिल्या गेलेल्या ग्रंथांची ! "
"आणि न लिहिल्या गेलेल्या ग्रंथांची ?
दारिद्र्यानं पीडला आहे,
पत्नी क्षयानं अंथरुणाला खिळली आहे,
अशा असंख्य अभागी लेखक–कलाकारांच्या अंत:करणातले
नवनिर्मितीचे कोवळे कोंब–

जागच्या जागी जळून गेले असतील–
त्यांची सूची कोण करणार ?"
वाद वाढायला नको म्हणून चलाख चिटणीसानं–
–एकूण चिटणीस ही जमात मोठी चलाख–
घासाचा 'ट्रे' पुढं सरकवला !
दोन चार घास खाल्ले असतील नसतील तोंच–
गळ्यात चादर,
हातात तंबोरा–
असे एक ऐस पैस बंगाली बाबू आले :
"नोमस्कार !"
त्यांनी हात जोडले, म्हणून मी कान जोडले !
"आमार बांगला–"
"छे छे– आम्हा गरिबांचा कुठून बंगला असायचा–?"
"शास्त्रीय संगीत–"
"मी स्वत: उपासक आहे– बोला, ऐकवू दरबारी कानडा ?"
"नको–नको ! आमची 'गुणकली' ऐकायला चला–"
"चला–"
एकीकडे 'गुणकली' ऐकत होतो–
एकीकडे घास खात होतो !
दोन्हीतली तन्मयता, एकात्मता शिगेला पोचली
तेव्हा वाटायला लागलं :
आपण गुणकली खातो आहोत आणि घास ऐकतो आहोत !!
एव्हाना बहुतेक लेखक खुर्चीच्या पाठीवर मान टेकून
स्वस्थ झोपी गेले होते आणि
निवांत घोरु लागले होते !

तिन्ही ॲकॅडमींच्या संयुक्त बैठकीची
ही संगीत फलश्रुति !!!
अशा रीतीनं दीड तास गुणकलीचं पीठ पाडून झाल्यावर
पंधरा मिनिटांची सुट्टी देण्यात आली–
नसती दिली
तर बहुतेक श्रोते मूर्च्छित पडले असते !
मध्यंतरात
गवयापासून लांब लांब वसलेल्यांना चहा
आणि
गवयाच्या जवळ बसलेल्यांना 'ऑक्सीजन' देण्यात आला !!
चहापान करता करता मी शेजाऱ्याला विचारलं :
"काय हो हे तुमचं शास्त्रीय संगीत ?
एकच एक तान पुनः पुन्हा घ्यायची
म्हणजे तेच ते गणित दोन लाख वेळा सोडवायच्या
शिक्षेसारखं नाही का ?
अशानं ऐकणारे वेड लागून आत्महत्त्या नाही का करीत ?
"ऐकणाऱ्यांचं ठाऊक नाही–
पण कधी कधी गाणारा बेहोष होतो !
मग आम्ही त्याच्या तोंडावर पाणी मारतो
आणि त्याला घरी पोचवतो !"
अशा आमच्या गप्पा इकडं ऐन रंगात आल्या होत्या
आणि तिकडं उस्ताद राघिवअली खाँ रुसून बसले होते :
"जोपर्यंत या मैफिलीत– एक गधा मौजूद है।"
तोपर्यंत ते 'मियाँ की मल्हार' सुनवायला तैय्यार नव्हते !
कला–केंद्राच्या संचालकांनी मोठ्या खुबीनं यातनं मार्ग काढला–

ते मला म्हणाले :
"चला, चला ! आपण अजून आमचं प्रदर्शन पाहिलेलं नाही–"
"नाही !"
"चला, चला–नाहीतरी मॉडर्न आर्टला
तुमच्याहून थोर प्रेक्षक दुसरा कोण मिळणार आहे ?"
"चला, चला !"
मला प्रदर्शन दाखवणारे आर्टिस्ट पी. चंद्रा
यानी तब्बल पाच वर्षं पॅरिसमधे राहून
भारतीय चित्रकलेचा अभ्यास केला होता !
त्यांच्या "काटेच काटे"
या चित्राला दोन नंबरचं बक्षीस मिळालं होतं,
म्हणून मी ते जरा बारकाईनं पाहू लागलो–
ही भली मोठी पाठ !
जरा न्याहाळून पाहिलं तर असा भास होत होता
की एक नग्न स्त्री पाठमोरी वळून पायातला काटा काढते आहे !
माझं माथं एकदम भडकलं :
"काय हो,
ह्या विचारीला या चित्रात निष्कारण–विवस्त्र दाखवण्यात
तुमचा मतलब काय ?
ती विवस्त्र असेल, तर बाथरुममधे असणार !
म्हणजे तिथं तिला काटा बोचण्याचा सुतराम् संभव नाही !!
बरं, बाहेर हिला कुठंहि काटा बोचला,
तरी हिच्या अंगावर कोणता ना कोणता पोषाख असणार !!!"
तर ते म्हणाले :
"तुम्हा मंडळींचं हेच तर चुकतं–

आधीच तुम्हाला मॉडर्न आर्ट मधलं काही कळत नाही !
आणि त्यातून तुम्ही वर वर पहाता–
जरा खो ऽ ऽ ले पहा–"
"आम्ही तर थकलो बघून बघून–तुम्हीच पहा खो ऽ ऽ ल–"
"तुम्हाला काय वाटतं ?
चित्रकाराला काय सांगायचंय् ?"
"काय ?"
"या स्त्रीला काटा बोचलाय्–असं ?" "अर्थातच !"
"मुळीच नाही ! अहो, ही साधी चित्रकला नाहीए–
ही मॉडर्न आर्ट आहे मॉडर्न आर्ट !
इथं चित्रकाराला तुम्हाला सांगायचंय्
की ही स्त्री त्या काट्याला बोचलीय् !!!"
"पटलं !"
पुढं एका चित्रात त्रिकोण, चतुष्कोण, षट्कोनात विखुरलेले
स्त्रीचे अवयव .... म्हणजे बाहूंच्या जागी व्हायोलिन,
मानेच्या जागी सतार, धडाच्या जागी तंबोरा–
आणि कंठातनं बाहेर डोकावणारा हातोडा !
"अहो, हे काय ?"
"ही रोशनआरा बेगम !"
"ह्यांनी स्वत: पाहृयलंय् का हे चित्र ?"
"नाही, पण त्यांच्या यजमानांनी पाह्यलंय्–
आणि तेव्हापासून खिशात पिस्तुल ठेवून ते शोधताहेत
चित्रकाराला !"
"मग–सापडला का तो ?"
"छ्या–पळाला पार पाकिस्तानात !"
"बरं झालं पळाला–नाहीतर, इथं नक्कीच कुणाचा
ना कुणाचा तरी खून पडला असता !

बाकी, 'असता' कशाला ?
कलेचा खून पडलाच आहे की !"
सगळं समजावून घेतलं,
तरी तो 'कंठातला हातोडा' काही कळेना.
म्हटलं :
"तो तेवढा समजावून द्या बुवा–
मघाच्या काटचासारखा !"
"त्याचा अर्थ असा आहे
की बाईच्या गळ्यातनं निघणारा प्रत्येक सूर
कसा हातोड्यासारखा मजबूत असतो ! मजबूत !!"
बोलत बोलत आम्ही खिडकीपाशी आलो
तो उस्ताद राधिवअली खाँ यांचा
मियाँ–की–मल्हार
असलेच हातोड्यासारखे मजबूत सूर फेकून
आमच्या कानावर घणाचे घाव घालीत होता :
'विजली चमके वरसे वरसे
मेहरवा तुम आयी वदरिया——
गरज गरज मोहे अताहि डरावे ॥
घन गरजे घन विजली विजली चमके
पपिहा पियुकी टेर सुनावे
कहाँ कद्र कित जाऊं मोरा जियरा तरसे ॥'
आता तर माझा सुद्धा सोशिकपणा संपला !
आम्ही पटकन् पुढे पळालो.
समोर पहातो तों एका भल्या मोठ्या कॅन्व्हासवर
एक भला मोठा मासा, त्याच्या पोटात आणखी एक मासा
त्याच्या पोटात आणखी एक.

मला मॉडर्न आर्ट मधलं काही कळत नाही हे पाहून
ते मला समजावून सांगू लागले :
"मुंबईचे प्रसिद्ध चित्रकार बगलोल यांचं आहे हे चित्र !
ते फक्त माशांचीच चित्रं काढतात–"
"असं का ?"
"त्यांच्या प्रेयसीला शार्क माशानं गिळलं,
तेव्हापासून प्रत्येक गोष्टीत त्यांना मासाच दिसतो !
आणि त्यांच्या प्रत्येक चित्रात त्यांची प्रेयसी असतेच असते–
कधी ती माशाच्या डोळ्यात असते,
कधी ती माशाच्या पोटात असते–
ह्या चित्रात सुद्धा आहे !"
प्रेयसी आहे म्हटल्यावर आम्ही जरा बारकाईनं पाहू लागलो।
"तुम्ही म्हणता– पण मला ती कुठं दिसत नाही–"
"असं कसं होईल ?
सकाळी ११ वाजता होती !"
"होती ? तर तुम्ही शोधून काढा आणि मला दाखवा–"
त्यांनी ते चित्र दोन मिनिटं बारकाईनं न्याहाळलं
आणि विलक्षण दु:खित सुरात मला ते म्हणतात कसे :
"पचली वाटतं !!!
सुकुमार प्रेयसी–पटदिशी पचली विचारी !"
इथं त्यांनी चक्क एक अश्रू पुसला . . .
या भुक्कड चित्राला देखील बक्षिस मिळालेलं पाहून
मी तर अगदी चाट पडलो.
म्हटलं :
"आमची बाराबंकीची शेंबडी पोरं याच्यापेक्षा चांगले–
माशासारखे दिसणारे मासे– काढतात !"

"त्याचं काय झालं– एकेक एकेक चित्र पहात पहात–
परीक्षक ह्या चित्रापर्यंत आले,
तोपर्यंत दुपारचे बारा वाजून गेले होते–
पोटात कडकडून भूक लागलेली–
समोर हे असं माशांचं चमचमीत चित्र !
देऊन टाकलं झालं बक्षिस ! !"
म्हटलं :
"सारस्वताच्या दरबारात याच्याहून वेगळं काय होणार आहे !"
असलीच चित्रं काढणाऱ्या जागतिक किर्तीच्या एका चित्रकाराला
१८–२० वर्षांच्या, १८–२० हजारांच्या गाड्या बाळगणाऱ्या
दोन तरुण मुलींनी एक प्रश्न विचारला :
"तुम्ही ही असली चित्रं काढता तरी कशी ?"
कलेतलं सर्व श्रेष्ठ तत्त्व detachment अलिप्तता–
ते मी पुरेपूर पाळतो !"
"म्हणजे कसं ?"
"माझ्या चित्रकृत्तींना माझ्या हाताचा देखील स्पर्श मी होऊ
देत नाही.
"अय्या– नाही ? मग ?"
"मी एक कुत्र्याचं पिल्लू बाळगलंय्–
फरशीवर रंगाच्या चार दोन वाटल्या सांडून देतो–
त्यातनं पळवतो त्या पिल्लाला–
आणि मग ते जेव्हा ड्रॉइंगपेपरवरनं पळत पळत जातं,
आणि त्यातनं जे काही निर्माण होतं,
त्याचा अर्थ ठरवीत बसतात– मर्मज्ञ, रसिक, जाणकार !
विशेषत: चौसष्ट कलांवर सारख्याच सफाईनं बोरु चालवणारे
दैनिक वर्तमानपत्रातले बोरुबहाद्दर स्तंभलेखक ! !– आणि मग,
त्यांना 'ब्रह्मांडाच्या पोकळीत देखील अवकाशाच्या आकाशाचा

पोल' दिसतो !"
कुठं तरी attachment जोडायच्या वयात आलेल्या
त्या पोरींना हे detachment चं तत्त्व कितपत कळलं–
परमेश्वराला ठाऊक !
इतक्यात "कुठं निघालात !" रुपवती मला खेचीत होती.
"चला माझ्यावरोबर !" दुसऱ्या बाजूनं कमला.
"हा गाढव माझा आहे–" "माझा आहे हा गाढव–"
त्या दोघींची रस्सीखेच चांगलीच रंगली.
इकडं माझा जीव जायची वेळ आली !
मग डोळे मिटून चारी लाथा सपाटून झाडल्या !!
बिचाऱ्या मॉडर्न आर्टचा क्षणार्धात उकिरडा झाला...
ते रंगाचं थारोळं– ते कुत्र्याचं पिल्लू– ती रोशनआरा बेगम–
तिच्या कंठातनं डोकावणारा तो हातोडा !
इकडे रुपवती आणि कमला यांची चांगलीच जुंपली फ्रीस्टाईल !
पाच मिनिटात पन्नास प्रियकरांचा उद्धार झाला !!
थोड्याच वेळात शेटजी तिथं धापा टाकीत टाकीत,
आणि पोलिस सावकाऽऽश येऊन पोचले !
मोठ्या मुष्किलीनं त्यांनी ती फ्रीस्टाईल सोडवली...
आम्ही शेटजींच्या बंगल्यावर पोचलो
तेव्हा मध्यरात्रीचे बारा वाजून गेले होते.
घरी पोचताच रुपवतीनं छडी घेतली
आणि रागारागानं ती मला म्हणाली :
"असं काय त्या कमलेत जास्त आहे हो, की जे माझ्यात नाही ?"
"अग, खरं म्हणजे
माझ्या दृष्टीनं तुम्हा दोघींमध्येहि काहीच अर्थ नाही !"
माझ्या या बोलण्याचा सोयीस्कर अर्थ लावून–
तिनं छडी फेकली आणि लाडीगोडी सुरु केली :

लग्न झाल्यावर माझा काय रुबाव असेल–
विवाहाचा वाढदिवस कसा थाटात साजरा करायचा–
अशी झकास साखर–पेरणी करून–
रुपवतीनं ब्लाऊझमधून हळूच एक कागद काढला–
ह्या ढमाल्या श्रीमंत बायका ब्लाऊझमधनं काय काय काढतील
ब्रह्मदेवाच्या बापाला सांगता येणार नाही !
अहो, परवा एकीनं एक हत्ती काढून दाखवला–
बुद्धिबळातला ! ! – मी विचारलं : "हे काय ?"
"कॉन्ट्रॅक्ट !" "कसलं ? लग्नाचं ?"
"अं हं ते पंतप्रधानांनी तुम्हाला दिलेलं–"
प्रेमाच्या झुलीला लावलेलं हे लोभाचं अस्तर
मला चांगलंच बोचायला लागलं !
"डार्लिंग, कर ना सही– माझ्यासाठी–"
"अग रुपवती, तुझ्यासाठी मी काय करणार नाही ?
बोल तुला पाठीवर घेऊन बाराबंकीपर्यंत पळत जाऊ ?
की तुझ्या नव्या बंगल्यासाठी विटा वाहून आणू ?
हा पठ्ठ्या एकटा सगळ्या विटा वहायला तयार आहे–!
की, तुझ्या खिडकीखाली उभं राहून रात्रभर शास्त्रीय संगीत–
सुनवू– दरबारी कानडा ?"
असं आमचं झकास प्रियाराधन चालू असतानाच शेटजी
किंचाळत तिथं आले :
"अग रुपा, रुपा–आभाळ फाटलं, आभाळ!" काय झालं शेटजी?"
"तांदूळ उतरला, कापड स्वस्त झालं, सीमेंटवरचा कंट्रोल उठला–"
"शेटजी, एकाहून एक चांगल्या बातम्या तुम्ही सांगताय्–मग
यात तुम्हाला रडण्या-केकण्यासारखं काय झालं ?"
"वा : वा : ! त्या तुम्हाला चांगल्या असतील, पण माझं
दोन कोटींचं नुकसान होणार– दिवाळं काढावं लागेल दिवाळं !"

त्यांच्यापेक्षा त्यांची मुलगी जास्त शहाणी होती–
"बाबा, तुम्ही शांत व्हा–
ह्या एका कॉन्ट्रॅक्टमधे तुमचं सगळं नुकसान भरुन– येईल–
कर ना सही–"
"अग रुपवती, या कागदावर एक सोडून शंभर सह्या करायला
मी तयार आहे ! पण यात लिहिलेलं कॉन्ट्रॅक्ट आहे कुठं ?"
"म्हणजे ? याचा अर्थ काय ?"
"त्या दिवशी तुम्ही मला पुरतं बोलू तरी दिलं का ?–"
माझं हे वाक्य मात्र त्या दोघांनी पुरतं ऐकून घेतलं,
आणि रुपवतीनं छडी घेतली.
शेटजींनी सोटा उचलला– मी आजूबाजूला पाह्यलं–
तर चारी वाटा बंद होत्या ! ! मनात म्हटलं
अचानक मिळालेल्या मोठेपणानं आणून सोडलेल्या या सोनेरी
पिंजऱ्यात बसून डाळिंबाचे दाणे खाताना गोड वाटलं !
त्या गरीब बिचाऱ्या विधवेला विसरलास– भोग त्याची फळं ! !
डोळे गच्च मिटून घेतले–
दुसऱ्या दिवशी दिल्लीच्या वर्तमानपत्रात बातमी छापून आली :

> **"बोलणारा गाढव जबर जखमी झाला आहे**
> **त्याच्या सर्वांगावर पट्ट्या चिकटवल्या आहेत.**
> **एकदोन बरगड्या पण मोडल्या असतील."**

सर्व रसिकांना नम्र विनंती आहे : की त्यांनी ह्या शहाण्या आणि
बोलक्या गाढवासाठी परमेश्वराची करुणा भाकावी !
जगला, वाचला– तर तो तुम्हा रसिकांच्या भेटीला
पुन्हा आल्याशिवाय राहणार नाही !
धन्यवाद ! !

(समाप्त)

म. ग्रं. ... बाल ... का. क्र ...१९०... दिनांक
BVBK-0400890